
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १११६
IRBK-0101116



IRBK-0101116
IRBK-0101116

श्रीविष्णु:—लाडके, मी तुला माझी मूर्तिमंत लाडकी लक्ष्मीच समजतों ! (पृ. २१)

दा. क्र. ११९६

मराठी ग्रंथ संग्रहालय

मराठी ग्रंथ संग्रहालय

वा. ना. नं. ७४६

ता. ६-११-३३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

स्वा वा. श्रीमंत अण्णासाहेब पटवर्धन बी. ए. कुरुंदवाड संस्थानाधिपति
( सीनियर ) यांचे पुण्यस्मरणार्थ स्थापन झालेली

# भालचन्द्र–ग्रन्थमाला

पुष्प ९ वें.

ना.
८०६

# लाडकी लक्ष्मी

[ गद्यपद्यात्मक, पौराणिक, तीन अंकी नाटक ]

" माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः । " अथर्व. १२।१
" नमो मात्रे पृथिव्यै । नमो मात्रे पृथिव्यै ! " यजु. ९।२२

IRBK-0101116
IRBK-0101116

लेखकः—

गणेश कृष्णशास्त्री फाटक.

म. ग्रं. ... संग्रहालय शाखा.
ग्रं. क्र. २११६ नों दि ........
वि. नाटक १९३२ ........

प्रथमावृत्ति. ] [ मूल्य १ रुपया.

प्रकाशक—विनायक आण्णाराव घैसास,
टिळकवाडी घ. नं. १९९ (६) पुणें.

श्री० गणेशशास्त्री फाटक यांचीं

## रंगभूमीवर आलेलीं

## नाटकें.

१ स्वर्गसाम्राज्य.
२ क्रांतिकौशल्य.
३ श्रीकृष्णदान.
४ बालगोपाल.
५ पंतांची सून.
६ दिलदौलत
७ नानांची माया.
८ माझी जमीन.
९ स्वर्गसुंदरी.
१० लाडकी लक्ष्मी.

---

## लवकरच रंगभूमीवर येणारीं

## नाटकें.

१ व्याही विहिणी.
२ डेक्कन क्वीन!
३ बभ्रुवाहन.
४ वरप्रदान.
५ चौकट राजा!
६ रक्ताचा घोट.
७ सिंहगर्जना.
८ लोककल्याण!

मुद्रक—वासुदेव नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.



१ कै. श्री. थोरले बाळासाहेब कुरुंदवाडकर; २ कै. श्री. सौ. द्वारकाताईसाहेब; ३ रा. कोकटनूर;
४ कै. गणेशभट फाटक; ५ कै. ती. कृष्णशास्त्री उर्फ पैलूशास्त्री फाटक.

ॐ

सदाचार, पापभीरुत्व, गोड स्वभाव, रसाळ वक्तृत्व, विनोदी वृत्ति
नाट्यनैपुण्य, आकर्षक चर्या, व्यायामप्रियता
इत्यादि सद्गुणांनीं
राजेरजवाड्यांपासून तो गोरगरीबांपर्यंत आबालवृद्धांना अत्यंत
प्रिय झालेले, अजातशत्रु, राजयोगी व
कुरुंदवाडदरबारचे सन्माननीय आश्रित

**माझे तीर्थरूप**

**कृष्णशास्त्री गणेशशास्त्री**

अथवा

# पैलूशास्त्री फाटक

हे

शा. श. १८५४, कार्तिक शु. ४ स, ता. २।११।३२ रोजीं,
सायंकाळीं ७। वाजतां
श्रीगणेशगीता श्रवण करीत असतां, शांत चित्तानें

**श्रीमंगलमूर्तिस्वरूपांत विलीन झाले!**

**त्यांच्या पवित्र आत्म्यास**

हें दूर्वादल

**भक्तिभावानें अर्पण केलें आहे!**

—गणेश

# श्री. फाटकशास्त्री यांचें नाट्यवाङ्मय

## पंतांची सून

श्री. फाटकशास्त्री यांचें हें विनोदप्रधान, सामाजिक नाटक महाराष्ट्राचें अत्यंत लाडकें झालेंच आहे; पण यानें कानडी रंगभूमीवरही (मंगलोर, अंबाप्रसादिक कर्नाटक संगीत मंडळी —'रायर सोसे') प्रवेश करून आपलें लोकप्रियतेचें स्थान अढळ राखलें आहे. किं. १ रु. ट ह. शिवाय.

---

## डेक्कनक्वीन

श्री. फाटकशास्त्री यांनीं हें सामाजिक, संगीत, मराठी नाटक अगदीं वेगळ्याच पद्धतीवर लिहिलें आहे. 'दाक्षिणगड' संस्थानच्या महाराजांनीं स्थापन केलेली 'डेक्कनक्वीन' नांवाची कापडाची गिरणी, तेथल्या अधिकाऱ्यांचें 'चरण्याचें कुरण' कशी होते, व त्याकरितां ते गिरणीमजुरांचा व पुढाऱ्यांचा कसा छळ करतात, पण सत्याचा जय होऊन संस्थानचे अधिपति गोरगरीबांना न्याय कसा देतात, याचें अत्यंत हृदयस्पर्शी चित्र या नाटकांत रेखाटलें आहे. गंभीर प्रवेशांनीं प्रेक्षकांच्या मनाला अधिक ताण बसूं नये, म्हणून यांत मार्मिक व निर्मळ विनोदाचाही भरपूर उपयोग केला आहे. हें नाटक **रघुवीर सावकार** यांच्या रंगभूमीवर अत्यंत लोकप्रिय झालें आहे. छपाई सुंदर व सचित्र किं. १ रु. ट. हां. नि.

**पत्ता:—स्वर्गसाम्राज्य पुस्तकालय—कुरुंदवाड [स्टेट.]**

याशिवाय मुंबई, पुणें, नागपूर, सोलापूर, सांगली, मिरज, कोल्हापूर, बेळगांव, रत्नागिरी, मडगांव व ए. एच. व्हीलरचे बुकस्टॉल्स वगैरे ठिकाणींही वरील पुस्तकें मिळतील.

# कमल

'आत्मविकास' या नांवानें पूर्वीं कांहींसें प्रकाशांत आलेलें हें नाटक **लाडकी लक्ष्मी** या नव्या नांवानें, रंगदेवता **रघुवीर सावकार** यांनीं आपल्या **रंगदेवता थिएट्रिकल कंपनीकडून, बेळगांव** येथें, शिवानंद थिएटरांत, गुरुवार ता. २९।१०।३१ रोजीं, रात्रौ १०–३५ वाजतां, सुमुहूर्तावर प्रथमतः रंगभूमीवर आणलें.

अद्भुत रामायणाच्या आधारें लिहिलेल्या या 'लाडकी लक्ष्मीं' तील तत्त्वें मी वाचकांच्या समोर इतक्या ठसठशीत आणि सोप्या पद्धतीनें मांडलीं आहेत कीं, पुनः त्याबद्दल आणखी कांहीं सांगितलें पाहिजे, असें मला वाटत नाहीं.

सच्छील व सज्जन रंगदेवता **रघुवीर सावकार** यांनीं 'स्वर्गसुंदरी' रंगभूमीवर आणल्यानंतर, तिचा पहिला वाढदिवस होण्याच्या आंत ही 'लाडकी लक्ष्मी' आनंदानें स्वीकारली, पुढील नव्या नाटकाचें आमंत्रण देऊन ठेविलें आणि आपल्या निर्व्याज प्रेमाचा 'सार्थ' लाभ करून दिला, याबद्दल त्यांचे उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत. कंपनींतील तरुण, उत्साही व अभ्यासू अशा नटवर्गानें–नाट्यरत्न **नेवरेकर**, अभिनयकुशल **भगवंतराव**, मा. **गोपीनाथ**, रा. **रायाबापू**, रा. **गंगेले**, मा. **विठ्ठल** व मा. **गोविंद** यांनीं आपलीं कामें उत्कृष्ट केलीं, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. नाटकांतील संगीताबद्दल अविश्रांत श्रम घेणारे प्रो. **बाबूराव दामलेबुवा** व देखाव्यांची सजावट करणारे चित्रकार श्री. **दिवकर** यांना जेवढे धन्यवाद द्यावेत, तेवढे थोडेच आहेत. नाटकाच्या बहिरंगासंबंधानें बोलावयाचें म्हणजे तें सुंदर तर सजलें आहेच, पण **श्रीसिद्धेश्वर** प्रेसचे मालक श्री. **वासुदेव नारायण ठकार** यांचा मला पाठिंबा नसता तर माझें वाङ्मय इतक्या तांतडीनें वाचकांसमोर आलें असतें कीं, नाहीं याची शंका आहे, हें मी कृतज्ञतेनें येथें नमूद करीत आहे; पुस्तकप्रकाशक मित्रवर्य **घैसास** यांचीही मला नेहमींप्रमाणें अमूल्य मदत होत आहे. याबद्दल या दोघांचे उपकार मानून मी आपलें हें 'लक्ष्मी' जवळ वसणारें 'कमल', पूर्ण करीत आहे. इत्यलम् पल्लवितेन।

वाग्विहारमंदिर, कुरुंदवाड (स्टेट)
३।१२।३१

रसिकांचा नम्र सेवक,
**गणेश कृष्णशास्त्री फाटक.**

## श्री. फाटक शास्त्री यांनीं लिहिलेल्या कादम्बऱ्या

# विक्रीस तयार !

१ **वीरात्मा:**—भाग २, पृष्ठें ७००, ही स्वतंत्र व चित्ताकर्षक कादंबरी वाचकांच्या हातांत पडल्यानंतर संपूर्ण वाचल्याशिवाय त्यांना जेवणही गोड लागणार नाहीं. सुंदर छपाई, विद्वानांचे उत्तम अभिप्राय. किं. ४ रु.

२ **आनाथांचा नाथ!**—ही राजकीय कादंबरी एकवार वाचण्यालायक आहे. भाषा व संविधानक अतिशय मोहक. किं. १॥. रु.

३ **ढोंगी गुरूच्या सैतानी लीला!**—धर्माच्या नांवाखालीं संभावीत सोदे, बोकेसंन्याशी कशा लीला करतात, याचें अत्यंत मार्मिक चित्र. किं १॥. रु.

४ **जयजयकार!**—बौद्धकालीन शुद्धिकरणावर लिहिलेली अत्यंत बोधप्रद कादंबरी. किं. ६ आणे.

५ **चेटूक:**—उपदेशपर व तेजस्वी तीन गोष्टींचा संग्रह. किं. ६ आणे.

६ **देशाचे ज्ञानदीप:**—देशसेवक तरुणांना 'खेड्याकडे चला!' म्हणून संदेश सांगणारी, तडफदार कादंबरी. किं. ६ आणे.

७ **कुऱ्हाड!**—हिंदुधर्मावर घाव घालणाऱ्या 'कुऱ्हाडी' आम्हीच कशा निर्माण केल्या, याचें भेसूर, पण बोधकारक चित्र. किं. ६ आणे.

किमतीशिवाय टपालहंशील निराळें पडेल.

**पत्ता:—स्वर्गसाम्राज्य पुस्तकालय—कुरुंदवाड.**

नोंद नं. ६९०६
ठाणे,
वा. ना. नं. ७४९
ता. २२-११-३३
ठाणें.

# लाडकी लक्ष्मी

## प्रभुप्रार्थना.

[ १ लें; रागः–तिलक कमोद; तालः–झपताल. ]
॥ प्रभुराज–पदकमलीं ॥ नमन–रति राहिली, ॥
मग ताप ना हृदयीं; ॥ सुख परम चिरकालीं ॥ ध्रु० ॥
॥ जरि वृत्ति चल बनली ॥ पथिं विमल घसरली, ॥
तरि देव वनमाली ॥ काढी नच साउली ॥ १ ॥

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

[ स्थळः–अयोध्येंतील बगीचा; पात्रें:–एकीकडून नारद व एकीकडून पर्वत भजन करीत प्र. करतात. ]

**नारदः**—

[ पद २ रें; कवाली-भजन; तालः- केरवा. ]
॥ मनुजा! मोहक सारा मायपसारा, झडकरि त्यजना ॥॥ ध्रु०॥
भुलवी होऊनि दारा, मोरपिसारा तिळभरी जिव ना ॥
भावरंगीं रंग भरला, संसृतीचा फिका पडला ॥ मोहपाशीं
जीव रमला, मोक्षमार्गा न का मुकला? ॥ २ ॥

ओहोहो! कोण पर्वतऋषि!

**पवतः**—अरे वा! अरे वा! कोण नारद ऋषि! ये, प्रिय मित्रा! मला एकदा कडकडून भेट! ( दोघे भेटतात. )

**नारद**:—वाहवा! आज दूध साखरेचंच संमेलन झालं म्हणायचं! खरंच, मित्रा, किती दिवसांनीं भेटलास रे! खऱ्या, प्रेमळ, प्रियमित्रांची भेट म्हणजे तो साक्षात् ब्रह्मानंदच आहे नाहीं?

**पर्वत**—आम्हा दोघांचं प्रेम इतर लोकांच्या प्रेमासारखं स्वार्थानं गढूळ झालेलं नाहीं; तें निर्मळ, निष्कलंक आहे!

**नारद**—बरोबरच आहे; तुझ्यापासून मला कांहीं मिळावयाचं नाहीं; आणि माझ्यापासून तुलाही कांहीं मिळावयाचं नाहीं. कारण तूं ब्रह्मर्षि असल्यामुळं आत्मतृप्त आहेस तर—

**पर्वत**—तूं देवऋषि असल्यामुळं ब्रह्मपदाला पोंचलेला आहेस! अशा स्थितींत आम्हां दोघांचं मित्रप्रेम परमेश्वराइतकंच पवित्र कां असणार नाहीं? बरं असो; पण, मित्रा, आज तूं या अयोध्येंत कुणीकडे?

**नारत**—या अयोध्येचा अधिपति, परमदेवभक्त, राजा अंबरीष आहेना, त्याची सहज भेट घ्यावी म्हणून मी आलों आहे. बरं तूं बरा इकडे आलास?

**पर्वत**—मीही राजाची भेट घेण्याकरितांच सहज आलों आहे.

**नारद**—होय का? छान छान! मग मला वाटतं, आम्ही दोघे राजाच्या भेटीच्या निमित्तानं एकमेकांचीच भेट घेण्याकरितां इथें आलों! हा एक मौजेचाच योगायोग म्हणायचा! (पाहून) अरे पण ती कोण?

**पर्वत**—(पाहून) आणि तिच्याबरोबर असलेला तो कोण?

**नारद**—तूं ब्रह्मर्षि, मी देवर्षि; आपल्याला करायच्या आहेत काय या भानगडी? असेल कोणीतरी ती आणि असेल कुणीतरी तो! (सुमति व श्रीमान प्र. क.)

**सुमति**—युवराज, हे कुणी तरी तपस्वी दिसताहेत!

**श्रीमान**—मग तपस्व्यांना नमस्कार करावा, असं बाबा नेहमींच सांगतात.

**सुमति**—मग नमस्कार करतां ना यांना?

**श्रीमान**—हो, अशांना नमस्कार करायला माझी एका पायावर तयारी असते!

**सुमति**—पायानं नमस्कार करूं नका; हातानंच करा म्हटलं!

**श्रीमान**—एवढं कांहीं शिकवूं नकोस मला तूं! मी आतां काय लहान आहे वाटतं?

**सुमति**—अयोध्येचे महाराज अंबरीष, त्यांचे हे युवराज श्रीमान आपल्याला वंदन करीत आहेत. आपल्याकडून त्यांना शुभ आशीर्वाद मिळेलच!

**श्रीमान**—चल जा! माझी माहिती तूं कोण सांगणार? मी शहाणा नाहीं कीं, काय?—आमच्या बाबांचा मुलगा मी आपल्याला नमस्कार करीत आहे! ( नमस्कार करतो. )

**नारद**—आहेत, युवराज श्रीमान खरोखरीच चाणाक्ष आहेत! युवराज, तुमचं नांव काय?

**श्रीमान**—आतां घेतलंत तेंच!

**पर्वत**—मित्रा, युवराज तसे फसणार नाहींत हं! बाळ तुमच्या आईचं नांव काय?

**श्रीमान**—मी आई म्हणतों; बाबा आमची ती म्हणतात; आणि सेवक लोक महाराणी म्हणतात; अशीं आमच्या आईसाहेबांना तीन नांवं आहेत.

**नारद**—पोर मोठा चिमखडा आहे!

**श्रीमान**—कांहो मला 'खडा' म्हणतां? खडा म्हणजे धाकटा दगड. मी दगड आहे कां? बाबासाहेब मला हुषार म्हणतात आणि तुम्ही तर मला खडा म्हणतां!

**पर्वत**—का प्रियमित्रा, युवराजांनीं तुला चूप बसविलं कीं, नाहीं?—युवराज, तुम्ही खडा, नाहीं, तर हिरा आहांत हिरा!

**श्रीमान**—पण मला आपल्या अंगठींत बसवूं नका हो!

**सुमति**—मी इथल्या मुख्य प्रधानांची मुलगी सुमति. माझी प्रियसखी राजकुमारी श्रीमती इथें बागेंत सहल करते आहे; तिच्याकडे जाण्याचा हट्ट श्रीमानांनीं घेतला, म्हणून यांना त्यांच्याकडे पोंचवितें आहे. (नमस्कार करते.)

**नारद**—दूर हो! पोरी! दूर हो!

**पर्वत**—किती जवळ येऊन नमस्कार करतेस? आम्ही कोण आहोंत, हें तुला माहीत नाहीं वाटतं?

**नारद**—आम्ही बालब्रह्मचारी, देवर्षि आणि ब्रह्मर्षि आहोंत समजलीस?

**पर्वत**—आणि आमच्याजवळ येऊन, आणि अगदीं आमच्या पायांना स्पर्श करून नमस्कार करतेस?

**श्रीमान**—( सुमतीस ) सुमती! अग सुमती! हे ऋषि असे एकाएकी कांग पिसाळले?

**सुमति**—युवराज! यावेळीं आतां अधिक कांहीं बोलूं नका! नाहीं तर कांहीं तरी भलताच अनर्थ व्हायचा! ( ऋषींना ) मुनिमहाराजांचा माझ्याकडून जो कांहीं अपराध झाला असेल......

**नारद**—तुम्ही स्त्रिया जन्माला आलां, हाच आधीं तुमचा पहिला अपराध आहे!

**सुमति**—अस्सं! अस्सं! तुम्ही सत्पुरुष असलां, तरी स्त्रियांचे वैरी दिसतां! तर मग मला या वेळीं माझ्या जातीचा अभिमान धरलाच पाहिजे! आम्हा स्त्रियांचा तुम्ही ब्रह्मचारी कितीही द्वेष करीत असलां, तरी एवढं पक्कं लक्ष्यांत ठेवा कीं, आम्ही जन्माला आलों, म्हणूनच तुम्ही जन्माला आलांत!—

[ पद ३ रें; चाल:—लावणीची; ताल:—धुमाळी. ]

**॥ घे जवळ इंदिरा हरि; हर धरी, शिरीं, प्रीतिनें गंगा; पार्वती शोभवी अंगा ॥ ध्रु० ॥ किती थोर थोर तापसी, वरुनि कांतेसी, करिति संसारा; हा मूढपणा का सारा? ॥ १ ॥ नरनारींचे करि लग्न, मुक्तिसी भग्न, तरी या मार्गा, धर्मात मिळत कां जागा? ॥ २ ॥**

**पर्वत**—एकजात स्त्रीजात, म्हणजे दुर्गतीची वाजत गाजत निघालेली वरात! स्त्रियांचं शरीर म्हणजे घाणीचं माहेरघर!

**श्रीमान**—मग कायहो ऋषिमहाराज! आपल्या पोटांत केशर कस्तुरीच आहे वाटतं?

**नारद**—चूप! अधिक बोलूं नका, युवराज!

**श्रीमान**—तुम्ही मोठे असल्यामुळं मी चूप बसतों, पण माझ्या प्रश्नाचं हें उत्तर नव्हे!

**पर्वत**—तुम्हा स्त्रियांच्या पदराचा अंगावरून नुसता वारा जरी गेला, तरी तेवढ्यानंही सारा तपश्चर्येचा डोलारा कोसळून पडायचा! स्त्रीसृष्टि म्हणजे मूर्तिमंत मोहाची वृष्टि! सारे लोक स्त्रियांमुळं मायापाशांत गुरफटत आहेत!

**नारद**—नाहीं तर केव्हांच साऱ्या जगाचा उद्धार झाला असता! स्त्रियांची सुंदर कुडी म्हणजे ती पुरुषांच्या पायांत पडलेली सोनेरी बेडी!

**सुमति**—संपली का स्त्रियांची निंदा? का आणखी करणार आहांत?

**पर्वत**—स्त्रियांचा मुखचंद्र, म्हणजे आमच्या भावसूर्याचं खग्रास ग्रहण.

**नारद**—स्त्रियांचं सुंदर हास्य, म्हणजे आमच्या ब्रह्मचर्याची भेसूर अमावास्या!

**पर्वत**—स्त्रियांचा शृंगार, म्हणजे आमच्या तपाला जाळणारा अंगार!

**नारद**—म्हणून म्हणतों, पोरी! दूर हो! पायांना स्पर्श करूं नकोस—जवळ येऊं नकोस!

**सुमति**—तुम्ही आम्हा स्त्रियांची आपमतलबीपणानं निंदा करतां, पण तुम्ही पुरुष काय कमी निंद्य आहांत? तुम्हा पुरुषांमुळंच आम्ही जन्माच्या गुलाम होतों! तुम्हांला आम्ही देव मानायचं आणि त्याचं बक्षीस काय, तर जन्मभर तुमच्या खरपूसशा लाथा खायच्या; तुमची पूजा करतां करतां बायकांना देवाकडेही लक्ष्य द्यायला वेळ मिळत नाहीं! बायका घाणीची खाण असतील, पण या बाबतींत तुम्ही त्यांच्यावरही ताण करतां!

**पर्वत**—मित्रा! पोर मोठी खमंग दिसते! आमचं तोंड बंद करणारसं वाटतं!

**नारद**—हंः! या पोरीला गप्प बसवायला कितीसा उशीर?

**सुमति**—स्त्रीजात निंद्य असती, तर ती वेदमान्य मातृदेवी बनलीच नसती-इतकंच नव्हे तर ती परमेश्वरानं निर्माणच केली नसती! मला वाटतं, स्त्री-जात तर वाईट नाहींच, पण तिला भिणाऱ्या तुमची तपश्चर्या मात्र आमच्या पदराच्या वाऱ्यानं कोसळून पडण्या इतकी कच्ची दिसते! खरा तपस्वी असा कच्च्या दिलाचा आणि अरेरावी तोलाचा नसतो! तो जगांत कुणालाच भीत नाहीं आणि त्याच्यापासूनही कुणाला भीति नसते!

**पर्वत**—चूप! आमची निंदा करतेस?

**नारद**—आम्ही एवढे तपस्वी आणि आमचा अपमान करतेस?

**सुमति**—ज्या जातीनं निम्मं जग व्यापलं आहे, जिचा आधार घेतल्या-वांचून परमेश्वरालाही साकार बनतां येत नाहीं, जी नसती, तर तुम्हीही

जगाला दिसलं नसता, त्या स्त्रीजातीची तुम्ही मनमुराद निंदा करावी आणि ती मी मुकाट्यानं ऐकावी, असं आपलं म्हणणं आहे का? खऱ्या तपस्व्यांना असा संताप शोभत नाहीं! तुम्ही स्त्रीद्वेष्टे आहांत, पण तुमचं तरी स्त्रियावांचून कुठं चालतं आहे?

**पर्वत**—आमचीं लग्न झालीं नाहींत!

**नारद**—आम्ही कडकडीत ब्रह्मचारी आहोंत!

**सुमन**—लग्नं झालीं नसलीं, तरी तुम्ही वाजवीत असलेली वीणा, तिच्यावरची घोडी, घोडीवरची तार, तारेवरची खुंटी, तुमच्या हातांतली चिपळी, तुमच्या गळ्यांतली माळ, डोक्यावरची जटा, नेसलेली कौपिन, या साऱ्या स्त्रियाच आहेत ना?

**श्रीमान**—ऐकलंत? आपण बायकांच्या गराड्यांत सांपडलेले मुनि-महाराज आहांत म्हटलं!

**सुमति**—तुम्ही करीत असलेली तपश्चर्या ही स्त्रीच आहे! इतकंच काय, पण तुम्ही जिची अष्टौप्रहर इच्छा करतां, ती मुक्ति कोण आहे?

**पर्वत**—मित्रा! ही पोर फारच बेफाम होत चालली! घाल तुझी तंबोरी हिच्या डोक्यांत; मी सडकतों इकडे खडावांनीं!

**सुमति**—अगबाई! अजुनीं कच्चे ग बाई कच्चे! चला, युवराज, चला! (दोघे अंगावर धांवून जातात. ती पळून जाते; श्रीमान तसाच उभा राहातो.)

**श्रीमान**—सोडत नाहीं तुम्हांला! बायकांच्या अंगावर हात टाकायला तयार होणारे पहिलेच पुरुष दिसतां तुम्ही! असा आडवून धरतों—कसें जातां पाहूं?

**नारद**—युवराज! मुकाट्यानं चालते व्हा!

**श्रीमान**—सुमतीच्या अंगावर तुम्ही हात नाहीं ना टाकणार?

**पर्वत**—नाहीं टाकणार!

**श्रीमान**—तर मग मुकाट्यानं का हो? चांगला नमस्कार करून जातो!—

[ पद ४ थें; राग:—भूप; ताल:—त्रिताल ]

**॥ वंदितां या पदांना ॥ ध्रु० ॥ अतिशय गमे सुख मम मना; ॥ कुवासना, उरेच ना ॥ ऐसी घडे मधु घटना ॥ मिळे पुण्य सुजना ॥४**

**नारद**——मोहांत मन गुरफटूं नये म्हणून सदा जागरूक असणं हें आम्हां तपस्व्यांचं मुख्य कर्तव्यच आहे.

**पर्वत**——त्या कर्तव्याला अनुसरून तूं त्या प्रधानाच्या पोरीला खड-सावलंस, ही फार चांगली गोष्ट केलीस ! मित्रा, या जगांत फिरतांना असेच अनेक मोह पडण्याचे प्रसंग येणार; जर एकाद्या वेळीं माझं मन चलबिचल झालं, तर तूं मला सावध करशील ना ?

**नारद**——हो हो, अवश्य ! पण कदाचित् मीही भुलूं लागलों, तसं तूंही मला सावध केलं पाहिजेस.

**पर्वत**——हो हो ! अगदीं खचीत करीन !

**नारद**——दे तर तसं वचन !

**पर्वत**—हें घे. ( श्रीमती दिसते; तो हतबुद्ध होतो. )

**नारद**——कां रे मित्रा, असा भांबावल्यासारखा कां झालास ?

**पर्वत**——आपल्या सौंदर्याचे पाश माझ्या हृदयावर टाकून मला आप-ल्याकडे खेचणारी ती कोण बरं असावी ?

**नारद**——मित्रा, पाहूं नकोस–तिच्याकडे पाहूं नकोस ! स्त्रीमोह मोठा भयंकर आहे ! ( त्याचे डोळे झाकून आपण पाहातो. ) ( स्वागत ) आहाहा ! किती सुंदर तरुणी ही ( उघड ) मित्रा ! पाहूं नकोस ! तपश्चर्या ढासळेल ! ( स्व. ) बस्स ! मिठी मारावी तर असल्याच अप्सरेला मारावी ! ( उ. ) मित्रा माझ्या वीणेकडे पाहा——तिकडे पाहाशील तर तुझा अधःपात होईल ! ( स्व. ) हाय हाय ! या मोहक रमणीला पाहातांच मला संसार थाटावासा वाटूं लागला आहे !

**पर्वत**——माझ्या डोळ्यावर हात ठेवून तूं तिकडे पाहात आहेस वाटतं ?

**नारद**——छे छे ! तसं नाहीं !——मित्रा ! तूं इथें क्षणभर उभा राहा, मी ती कोण आहे तें पाहून येतों. ( जाऊं लागतो. )

**पर्वत**——( त्याला ओढून. ) छे छे ! तूं मोहांत सांपडशील !—मीच पाहून येतों !

**नारद**——छे छे ! मीच शोध करून येतों. तूं चलबिचल झाला आहेस ! कदाचित् भ्रष्ट होशील !

मराठी ग्रंथसंग्रहालय वा. नं. ता. ठाणें.

**पर्वत**—तुला मी एकट्याला मुळींच जाऊं देणार नाहीं!

**नारद**—तर मग दोघे मिळून जाऊं आणि तें लपतछपत जाऊं!

**पर्वत**—ठीक आहे. नाहीं तर ती सुंदरी आम्हांला पाहून बिचकायची· ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळ**—बागेचा दुसरा भाग; **पात्रें**:–श्रीमती, श्रीमान व सुमति. ]

**श्रीमान**—सुमति, पळून आलीस ना तूं त्या तंबोरीवाल्यांना पाहून? आहा ग भित्रे भागूबाई!

**श्रीमती**—ती स्त्री असल्यामुळं भागूबाई आहे, यांत नवल नाहीं; पण आपण काय पराक्रम गाजविलेत, तें सांगाना शौर्याचे सागर!

**सुमति**—खरंच, ताईसाहेब, ते तर दोघे स्वतःला देवर्षि आणि ब्रह्मर्षि म्हणवितात आणि एखाद्या पिसाट पशूप्रमाणं वर्तन करतात, हें आश्चर्य नव्हे का? खरे तपस्वी असे अरेराव असतात का?

**श्रीमती**—अग, उथळ पाण्याला खळखळाट फार! ज्यांची तपश्चर्या अर्धवट झालेली असते, ते असंच वागतात! पोकळ पोटाचा नगाराच नाहीं का अधिक शब्द करीत?

**सुमती**—( पाहून ) अगबाई! ते दोघे मेले इकडेच आले! आतां आपण कसं करावं? इथून जावं तरी पंचाईत, न जावं तरी पंचाईत!

**श्रीमती**—आपण त्यांना न पाहिलंसं करून पलीकडील ताटव्यांत फिरूं या चल. चला युवराज.

**श्रीमान**—तुम्ही व्हा पुढें. मी यांचा घेतों थोडासा समाचार!

**श्रीमती**—कांहीं अधिक प्रसंग करूं नका बरं! ( दोघी जातात; श्रीमान वेलीशीं खेळतो; नारद व पर्वत प्रवेश क. )

**नारद**—अरे, ती तर पलीकडल्या ताटव्यांत फिरूं लागली!

**पर्वत**—आणि इकडे आमची बुद्धिही भ्रमूं लागली!

**नारद**—हिचा मोहक मुखचंद्र पाहातांच माझ्या मनांतला स्त्रीद्वेषाचा अंधार नाहींसा होत चालला!

**पर्वत**–आणि हिची चटकदार चाल पाहून माझंही मन चवचाल बनूं लागलं!

**नारद**–हिच्या रेशमी, काळयाभोर, कुरळ, केशपाशांत एक मोगऱ्याचं फूल खोऊं का?

**पर्वत**–वाऱ्यानं भुरुभुरु उडणारा हिचा पदर जवळ जाऊन सावरूं कां?

**नारद**–हिच्या हरिणा-माणं सुंदर असलेल्या पाणीदार डोळ्यांना डोळा भिडवूं का?

**पर्वत**–कमलाप्रमाणं कोमल असलेले हिचे हात असे हातांत घेऊन हृदयाशीं धरूं का? अशानं तरी उसळणारं माझं हृदय शांत होईल का?

**नारद**–मित्रा! तूं आपल्या मार्गावरून भ्रष्ट होतो आहेस हं! ब्रह्मचाऱ्यानं परस्त्रीचं वर्णन करूं नये, असं शास्त्र आहे!

**पर्वत**–होय ना? मग तर तूं इथून एकदम चालता हो कसा! कारण परस्त्रीचं वर्णन मी न करतां तूंच करीत आहेस!

**नारद**–आणि तूं करीत नाहींस वाटतं?

**पर्वत**–नाहीं, कारण ही तुला परस्त्री असली, तरी मला नाहीं! मला ही स्वस्त्रीच आहे!

**नारद**–तुला लग्न करतां येणार नाहीं; कारण इच्याशीं मी लग्न करणार आहें! तूं ब्रह्मचारीच रहा. ब्रह्मचारी व्रतासारखी मजा नाहीं!

**पर्वत**-मग ती मजा तूंच लूट! मी आपला हिच्याशीं लग्न करून—

**श्रीमान**--शुभमंगल--पण--सावधान! शुभमंगल- पण--सावधान! काय हो बायकांचा द्वेष करणारे ब्रह्मचारीबुवा! बायकांना शिव्या देतां देतां बोहल्यावर चढण्याचीही भाषा तुम्ही बोलूं लागलांत कीं!

**नारद**--अरेरे! आमची भाषा या कारभाऱ्याच्या कानावर गेली वाटतं?

**पर्वत**--अरे, असा भितोस का? ती केव्हांतरी जाणारच; ती आतां गेली काय आणि नंतर गेली काय!--होय, आम्ही लग्नाची भाषा बोलूं लागलों आहोंत! आम्ही तपस्वी आहोंत!---आम्ही काय वाटेल तें करूं!

**नारद**--लग्न लावूनसुद्धां ब्रह्मचारी राहूं किंवा ब्रह्मचारी राहूनही संसार करूं-- आहोंतच आम्ही तपस्वी!---जा, त्या तुझ्या अक्काला म्हणावं, देवर्षि नारद बोलावीत आहेत!

**पर्वत**--छे छे! तसा निरोप सांगूं नकोस. आमच्या त्यांना म्हणावं" ब्रह्मर्षि पर्वत तुम्हाला पाचारण करीत आहेत!

**नारद**--लग्न झाल्यावांचून इतक्यांत तुमच्या 'त्या' कशा होतील? जा, बाळ, जा लवकर. मी बोलाविलं आहे म्हणून सांग!

**श्रीमान**--इथें उभे रहाहं. आणतों बोलावून! ( जातो. )

**पर्वत**--कायरे, नारदा, गळ्यांतली माळ कां काढलीस?

**नारद**--तिनं रुकार दिला, तर तिच्या गळ्यांत घालण्याकरितां!

**पर्वत**---मूर्खा! पुरुष कुठें बायकांच्या गळ्यांत माळ घालतात का! ( पाहून ) अरे आली! विजली आली! ( श्रीमती, सुमति व श्रीमान प्र. करतात; श्रीमती नमस्कार करूं लागते; तोंच तिला, सुमति मागें खेंचते. )

**सुमति**---नका, ताईसाहेब, जवळ जाऊं नका! 'या महात्म्यांना स्त्रिया जवळ आलेल्या खपत नाहींत!--शापून भस्मच करतील एखाद्या वेळीं!

**नारद**---नाहीं, तसं कांहीं नाहीं म्हणा! त्या अगदीं पायाला स्पर्श करून नमस्कार करूंद्यात! आम्ही तपस्वी सर्वांकडे समदृष्टीनंच पहात असतों!

**पर्वत**---येऊंद्यात, ताईसाहेब अगदीं जवळ येऊंद्यात!--नारदांच्या पायांना मात्र स्पर्श करूं नका म्हणावं; कारण तें परपुरुष आहेत!--माझ्या करायला कांहीं हरकत नाहीं!--या जवळ! करा नमस्कार!

**श्रीमान**---काय हो बैरागीबुवा! आमच्या अक्कासाहेबांना पाहून लटपटलांत वाटतं?

**नारद**---( पर्वतास ) या श्रीमतीवांचून बाकीची ही सारी अडगळ हाकून देऊं या!--तूं ही पण निघून जा! हिच्याशीं मला कांहीं बोलायचं आहे!

**पर्वत**--आणि मला बोलायचं नाहीं वाटतं?--तूंच निघून जा!--या, नमस्कार करा या. शंका धरूं नका. आतां मी कांहीं तुम्हाला परका नाहीं! ( श्रीमती नमस्कार करते. ) माझ्यासारखा सुंदर पति तुम्हाला प्राप्त होवो!

**नारद**---दचकूं नका! करा मला नमस्कार! कावळ्याचा शाप आणि या पर्वताचा वर यांची योग्यता सारखीच आहे!---या, भिऊं नका! ( नमस्कार करते. ) माझ्यासारखा--नव्हे--तर प्रेमळ असा मीच पति तुम्हाला अखंड लाभो'

**श्रीमती**---इश्श! ही कसली आशीर्वादाची रीत?

**पर्वत**---श्रीमती, तुमच्याशीं मला कांहीं गुप्त बोलायचं आहे. तुम्ही या सर्वांना जरा दूर करा पाहूं.

**नारद**---मलाही कांहीं बोलायचं आहे. यांना दूर घालवून द्या पाहूं!

**श्रीमतीः**---श्रीमान, सुमति, जरा बाजूला जाऊन लांब उभी राहा बरं.

**श्रीमतीः**---( हळूच ) ताईसाहेब, हे दोघे तपस्वी अतिशय तारट आहेत. यांच्यासमोर आपल्याला एकटीला सोडून जाण्याची भीति वाटते. हे कोपले आणि कांहीं भलतंसलतं झालं तर?

**श्रीमती**--तूं त्याची काळजी करूं नकोस; हे तपस्वी आहेत आणि मी आहे; पाहून घेतें काय तें! अग, माझ्या मोहानं यांच्या तपांतलं तेज नाहींसं होत चाललं आहे. हे वरून आव आणतात, तितकं सामर्थ्य यांच्या वाणींत खचीत राहिलं नाहीं! मन भ्रष्ट झालं कीं, त्यांतलं तेज विझलंच म्हणून समजावं! जा तूं. यांच्यापासून भ्यायचं बिलकूल कारण नाहीं!

**सुमति**---ठीक आहे ताईसाहेब. चला युवराज. ( स्व. ) आतां ही बातमी महाराणीसाहेबांनाच जाऊन कळवावी. (उ.) येतें हं ताईसाहेब! (जा.)

**नारद**--( पर्वतास ) आतां ही माझी पत्नी होणार; आतां हिला 'अग जाग' म्हणायला कांहींच हरकत नाहीं! ( मोठ्यानें ) श्रीमती, या पर्वतानाही घालवून दे बरं.

**श्रीमति**-- तें सामर्थ्य माझ्या अंगांत नाहीं!

**पर्वत**--श्रीमती, या नारदऋषींना हाकलून दे!

**श्रीमती**--आपण दोघेच एकमेकांना घालवूं शकाल!

**नारद**--श्रीमती, मी तुला लग्नाकरितां मागणी घातली आहे! तूं माझी पत्नी झाली पाहिजेस!

**पर्वत**--छेः मी तुला मागणी घातली आहे! या कळलाव्या नारदाच्या पायांवर चक्र पडलं आहे! याला त्रिभुवनांत सारखं फिरावं लागतं! याच्या मागून किती धांवपळ करणार, श्रीमती, तूं? याच्या मागं फिरतां फिरतां तुझ्या सुकुमार पायाचे तुकडे पडतील ग माझ्या सोनतुकडे!

**नारद**--माझा पिता ब्रह्मदेव आहे! साक्षात् शंकर तुझे दीर होणार! महाभगवान् विष्णु तुझे आजेसासरे! केवढं तरी हें आमचं मोठं घराणं?

केवढी श्रीमंती? या पर्वताच्या घरीं फुटकी कवडी तरी आहे कां? श्रीमती, याच्याशीं लग्न लावशील, तर तूं अन्नान्न होऊन मरशील!

**श्रीमती**--पुण्यमय तपश्चर्येचा मार्ग सोडून या लग्नाच्या भानगडींत तुम्हीं कां पडतां? उच्च पदावर गेलेले तुम्हीं नीचपदावर कां येतां?

**पर्वत**--गृहस्थाश्रम सर्व आश्रमांत श्रेष्ठ आहे म्हणून!

**श्रीमती**--मग जगांतल्या दुसऱ्या एखाद्या कुमारिकेशीं कां लग्न करीत नाहीं! जगांत कुमारिका काय थोड्या आहेत!

**नारद**-जगांत कुमारिका पुष्कळ आहेत, पण त्यांच्यावर माझं प्रेम कुठें आहे?

**श्रीमती**--तुमचं प्रेम माझ्यावर आहे, पण माझं तुमच्यावर असायला नको का?

**पर्वत**--काय? नारदावर तुझं प्रेम नाहीं? निम्मा विजय तर पदरांत पडला!

**श्रीमती**--नारदऋषे, तुम्ही आपली तपश्चर्या कशी विसरलांत? लोकांत कलह लावून गंमत करण्याची आपली हौस कुठें गेली? आणि ही काय अवदसा तुम्हाला आठवली? तुम्ही आपल्या श्रीमंतीचं वर्णन माझ्यासमोर केलंत, पण बायका पैसा पाहून प्रेम करतात, असा का आपला समज आहे? प्रेम नसेल तर स्त्रिया कुबेराच्या संपत्तींतही तडफडत पडतील आणि प्रेम असेल तर त्या अठराविश्वे दारिद्र्यांतही सम्राटलक्ष्मीची लयलूट करतील! प्रेम हेंच स्त्रियांचं जीवन आणि प्रेमहीन जीवन हेंच त्यांचं मरण!

**पर्वत**--नारदावर तुझं प्रेम नाहीं, हें तर ठरलंच, पण माझ्यावर तरी?

**श्रीमती**—तुमच्यावरही माझं प्रेम नाहीं. तुम्ही दोघेही मला बंधूप्रमाणं आहांत. निर्वाणीचा प्रसंग आला, म्हणून लाजलज्जा सोडून हें मला सांगावं लागत आहे!

**नारद**--पण माझं तुझ्यावर प्रेम आहे त्याची वाट काय?

**श्रीमती**–त्याची वाट परमेश्वराकडे आहे; माझ्या हृदयाकडे नाहीं! नारदा, तुम्ही प्रेम करा, पण परमेश्वरावर करा. माझ्यावरचं प्रेम तुम्हांला मारक होईल; पण त्याच्यावरचं मात्र तुम्हांला तारून नेईल!—

[ पद ५ वें; चालः—रामनामकी; तालः—त्रिताल. ]

॥ पापकामना कां न त्यजाना ? ॥ भाव विमल तो अंतरीं आणा ॥ध्रु०॥ गृहधनचिंता, दुर्गतिमाता; ॥ एक देव जगिं तारक माना ॥५॥

**पर्वत**–मी तुझ्यावरती प्रेम करतों आहे, त्या अर्थी तूं माझ्यावर केलंच पाहिजेस !

**श्रीमती**–प्रेमाच्या सृष्टींत जुलूमजबरदस्तीला थारा नसतो ! तुम्ही पुरुष म्हणजे जुलूमजबरदस्तीचे मूर्तिमंत पुतळे आहांत ! तुमचं प्रेम स्त्रीवर जडलं कीं झालं, तिचं तुमच्यावर आहे कीं नाहीं, याची तुम्ही विचारपूसही करीत नाहीं ! तुम्ही काळीं, कोळशाचीं भुतं असलां, तरी तुम्हांला स्त्रिया मात्र गोऱ्या पान हव्या असतात; जणुं काय तुम्ही पुरुष तेवढे जिवंत असता, आणि आम्हां स्त्रियांचे प्राण गेलेले असतात ! जणुं काय हृदय तेवढं तुम्हांला, आणि आम्हां स्त्रियांच्या अंत:करणांत दगड बसविलेला असतो ! डोळे तेवढे तुम्हांला आणि आम्हा स्त्रियांना कांहींच दिसत नाहीं !

**नारद्**–मुद्दे सणसणीत दिसताहेत !

**पर्वत**–यापेक्षां दणदणीत गुद्दे बरे !

**श्रीमती**–लांडग्याच्या तोंडांत मेंढरूं पडावं, तसे तुम्ही दोघे कामविकाराला बळी पडलां आहांत ! एखादा विश्वसम्राट् श्रमिक बनावा, त्याप्रमाणं देवर्षिब्रह्मर्षिपदांवर असणाऱ्या तुमच्या कपाळीं कामाचा बंदा बनण्याची पाळी आली आहे ! माझ्या डोळ्यांना पाणी येतं, तें या तुमच्या दुर्दशेबद्दल ! अरेरे ! काय ही तुमची शोचनीय स्थिति !

**नारद्**—बस्स ! अधिक वटवट ऐकून घेण्याची आमची इच्छा नाहीं !

**श्रीमती**—मग काय तुम्ही मला जुलमानं आपली बायको करणार ?

**पर्वत**—नुसती करणार नव्हे, तर नाकांत वेसण घालून फरफरा ओढीत नेणार !

**श्रीमती**–आपल्या पवित्र तपाचा उपयोग, जुलूमजबरदस्तीनं दुसऱ्याच्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला ठोकण्याकडे करणार असाल, तर तुमच्या तपाला धिक्कार असो ! तपश्चर्या दुसऱ्याला गुलाम करण्याकरितां नसते; तपश्चर्येचं फळ मोक्ष, स्वातंत्र्यच मिळालं पाहिजे !

**नारद**—स्त्रिया स्वातंत्र्याला पात्र नाहींत!

**श्रीमती**—म्हणजे स्त्रिया पशु आहेत अशी का तुमची कल्पना आहे? पशूंनासुद्धां पारतंत्र्यांत ठेवलेलं मला मान्य नाहीं! प्रत्येकाचा स्वातंत्र्यांतच जन्ममृत्यु झाला पाहिजे! माझा प्राण गेला, तरी मी तुम्हांला वरणार नाहीं।

**पर्वत**—कशी वरीत नाहींस पाहतों! लग्नाची संमति तूं दिली नाहींस तर तुझ्या पित्यापासून घेईन!

**श्रीमती**—माझं स्वातंत्र्य हिरावून घ्यायला बाबांनीं अजुनी कांहीं ताळतंत्र सोडला नाहीं! त्यांतून ते तसं करायला तयार झाले, तर मी त्यांच्या पायाशीं प्राण देईन! मग खुश्शाल माझ्या कलेवराला ओढीत न्या!

**पर्वत**—माझी आज्ञा जुमानीत नाहींस! शापून भस्म करतों!

**नारद**—ए! खबरदार हिला शापानं मारशील तर! ही मरायच्या आंत तुझाच शापानं मुडदा पाडीन समजलास! काय बोलायचं तें तिला धक्का न लावतां बोल! लग्न झाल्यानंतर अशाच बायकोच्या प्राणांच्या पोळ्या होरपळणार वाटतं?

**श्रीमती**—नारदऋषे, आज तुम्ही माझं सख्या भावाप्रमाणं रक्षण केलंत!

**पर्वत**—तुझ्या पित्याकडे जातों आणि तुला जबरदस्तीनें नेतों!

**श्रीमती**—माझ्यावर तुमचं खरं प्रेम असतं, तर तुम्ही माझा असा सूड घ्यायला कधींच तयार झाला नसता! जा, खुश्शाल बाबांच्याकडे जा! ( पर्वत जातो. )

**नार०**—श्रीमती, कांहीं दया—

**श्रीम०**—तुम्हीही खुश्शाल बाबांच्याकडे चला!

**नार०**—अस्सं! ठीक आहे! श्रीमती! पाहून घेईन! ( जातो. )

**श्रीम०**—देवा, ज्यांनीं न्याय द्यायचा, ज्यांनीं धर्म शिकवायचा, त्यांनींच जर असं न्यायधर्माच्या नरडीला नख लावलं, तर चालू पुण्य-युगाचीं चक्रं उलट फिरूं लागलीं, असंच मानलं पाहिजे! लग्न शरीराचं होतं कीं, हृदयाचं होतं? देवा भगवंता, मी तुला मनानं केव्हांच वरलं आहे; आतां माझी लज्जा तुझ्यावांचून कोण राखणार? प्राणेश्वरा, आपण माझ्या हाकेला धांवून याल का? तितकी पुण्यवान मी आहे का? काय

करूं, कसं करूं? आतां कांहीं सुचत नाहीं! आतां हे हट्टाला पेटलेले मुनी बाबांच्यावर संतापून साऱ्या सूर्यवंशाची राखरांगोळी उडविणार! त्यापेक्षां सर्व अनर्थांची मूळ मीच या जगांतून नाहींशी झालें तर? हो, असंच करावं. ( वेलीचा फास गळयाला अडकविते. ) बाबा! येतें!— आई! या दुर्दैवी पोरीला विसरून जा आणि माझ्या मरणाबद्दल मला क्षमा करा! देवा भगवंता! आपलं पातिव्रत्य राखण्याकरितां, ही आपली प्रिय पत्नी फासावर झोंके घेत घेत वैकुंठीं आपल्याकडे येत आहे, तर हिचा स्वीकार कराल ना?—बाबा! आई! हा तुम्हांला नमस्कार!—सर्व भूत-मात्रांनो! या हतभागी राजकुमारीचा हा शेवटचा प्रणाम घ्या! ( फास लावणार इतक्यांत श्रीविष्णु प्रगट होतात. ) अगबाई! मी आत्महत्या करून जगाचा निरोप घेत असतां, मला विघ्न करणारे तुम्ही कोण?

श्रीविष्णु—मी परपुरुष!

श्रीम०—परपुरुष? तर मग चला चालते व्हा इथून!

श्रीवि०—तूं बोलाविलंस म्हणून तर मी आलों आणि मला 'जा' म्हणतेस?

श्रीम०—मी वैकुंठवासी श्रीभगवंतांना बोलाविलं; तुम्हाला नाहीं! तुम्ही तर परपुरुष आहांत! माझं मन मी श्रीभगवंतांच्या पायावर वाहिलं आहे!—हांसतां काय असे? माझ्याकडे अशा नजरेनं पहाल, तर परस्त्री-वर पापदृष्टि ठेवल्याचं खडतर फळ तुम्हाला मिळाल्यावांचून राहणार नाहीं!

श्रीवि०—मी परपुरुष आहे, तर तूं परस्त्री आहेस! दोघेही आलिंग-नाच्या गोड विळख्यांत गुरफटलों, दोघांच्याही अधरोष्ठांतील अमृताचा अमरसंगम झाला, तर त्यांत बिघडलं कुठें? ये, अशी रागावून नागिणी-प्रमाणं फूत्कार टाकूं नकोस! ये, लाडके, ये!—

श्रीम०—लाडके! लाडके! 'लाडके' म्हणण्याचा अधिकार एकट्या भगवंतांचा आहे; तुमचा नाहीं!

श्रीविष्णु—लाडके! आहाहा! संतापानं या गौरवर्ण चेहऱ्यावर उधळलेली ही माणकांची ओंजळ किती शोभून दिसत आहे! लाडके! ज्याची तूं इच्छा करीत आहेस, तोच हा तुझा पर म्हणजे श्रेष्ठ असा पुरुष तुझ्यापुढें

उभा आहे आणि मीही जिच्या प्रेमाचा स्वीकार केला आहे, तीच ही माझी लाडकी पर म्हणजे श्रेष्ठ अशी स्त्री माझ्यापुढें उभी आहे! हृदयाला हृदय जडलं; प्रीतीशीं प्रीतीचा संगम झाला; लतापल्लवांनीं नटविलेल्या, आकाशाच्या भव्य मंडपाखालीं, सुंदर पक्ष्यांनीं मंजुळ स्वरात, मंगलाष्टकं म्हणत असतांना, एकमेकांनीं एकमेकांवर कटाक्षांच्या मंगलाक्षता फेकून शुभमंगल साजरं केलं; मग अजुनीही संशयाचा अंतःपट दूर होऊन नवी नवरी आपल्या प्रियकराच्या कंठांत करकमलाची वरमाला कां घालीत नाहीं?–

[ पद ६ वें; चालः—तुमहर गुन गावो; तालः—झपताल. ]

॥ **चारु नव प्रेम बाला** ॥ **प्रिया जाण, गमे प्राण; नित ध्यान मनाला ॥ध्रु०॥ कंठिं या करहार, वितरुनि करणार, स्वजन कधिं? जो फार मोहविला** ॥ ६ ॥

पाहा, श्रीमती, या जगाच्या राजाकडे—तुझ्या प्रिय दासाकडे प्रेमदृष्टीनं पाहा! आपल्या डोळ्यांत पेटविलेला संतापाचा अग्नि शांत कर आणि पूर्णचंद्राच्या अमृतमय शांतदृष्टीनं माझ्याकडे पाहा! पाहिलस? तोच–तोच–तोच ना मी?

**श्रीमती**–हें काय बरं नाथ! मला प्रगट होतांच कां ओळख दिली नाहीं?

**श्रीविष्णु**–तूं मला ओळखून काढशील अशी माझी कल्पना होती म्हणून!

**श्रीमती**–पण यावेळीं मी कोणत्या परिस्थितींत होतें बरं नाथ!

**श्रीविष्णु**–पण या वेळीं मी कोणत्या परिस्थितींत आहे? माझी प्रिय सखी माझ्या समोर असूनही मी विरहांत तळमळत नाहीं का?

**श्रीमती**–( आलिंगून ) आतां तरी विरह संपला ना?

**श्रीवि**–श्रीमती, माझ्या करपाशांची आशा सोडून या वेलींच्या फासांत कां बरं आपली मान अडकवीत होतीस?

**श्रीम०**–चला जा! बोलू नका माझ्याशीं! मी अगदीं इतकी निर्वाणीवर आलें, तेव्हां मला दर्शन द्यायचं झालं! माझ्यावर आपलं खरं प्रेम होतं ना?

ग्रा. ... वि. ...

श्रीवि०—लाडके! मी तुला माझी मूर्तिमंत 'लाडकी लक्ष्मी' च समजतों!

श्रीम०—तर मग आतांपर्यंत मला कां दर्शन दिलं नाहीं? माझ्या प्रीतीबद्दल संशय वाटला होय? नाहीं हो, हें सारं तनमनधन आपल्याच पायावर वाहिलं आहे! पण ते मेले निष्ठुर तपस्वी......

श्रीवि०—ते नारद पर्वत ऋषी ना? तूं कां काळजी करतेस? भलत्याच फंदांत पडलेल्या त्या गुलामांची मी चांगलीच खोड मोडतों! मग झालं कीं, नाहीं? बरं आतां एक गोडसा......

श्रीम०—तो पाहिला का हिंदोला? बसायचं गडे त्यावर; मी आपल्याला झोके काढतें. त्यावर बसलं म्हणजे मौज वाटते नाहीं?

श्रीवि०—पण तुझ्या हिंदोल्याच्या झोक्यानं आमच्या गोडशाला झोका दिला ना?—हें पाहा, तूंच बैस हिंदोल्यावर; मी तुला झोके काढतों.

श्रीम०—मी नाहीं गडे, आपणच बसलं पाहिजे!

श्रीवि०—नाहीं, तूंच बसलं पाहिजेस!

श्रीम०—इश्श! असं काय बरं करायचं? आपण बसावं, मी झोके काढतें!

श्रीवि०—आपणच बसावं, मी झोके काढतों!—काय नाहीं मनांत? बरं तर, आपण दोघं एकदमच बसूं या!

श्रीम०—हा हा! गडे, आपण छान युक्ति काढलीत! ( बसतात. )

श्रीवि०—तुझ्या मनाप्रमाणं गोष्ट झालीना? आतां नाहींना तूं आत्म-हत्या करणार? आतां नाहींना तूं भिणार?

श्रीम०—छेः गडे, अशी आपल्याला मिठी मारल्यावर कुणाची छाती आहे आपल्यांपासून मला हिरावून नेण्याची!

श्रीवि०—बरं आतां एक गोडसं—लाजूं नकोस; गोडसा नव्हे, गोडसं! गोडसं गाणं म्हण पाहूं!

श्रीम०—गाणं होय? एक सोडून दहा म्हणतें!—

[ पद ७ वें; चालः—आशा हमारीरे; तालः—अर्धा धुमाळी ]

**॥ लाभे मला प्याला ॥ भावरसें भरला ॥ ध्रु० ॥ सुकृत केलें; सौख्य ल्यालें ॥ प्रभुचा वर हा झाला ॥ ७ ॥**

वा. ना. नं. ... ता. १३-११-३३ ग्रा ग्रं.

## प्रवेश २ रा.

[स्थळ:–राजवाडा; पात्रें:–महाराणी व सुमती प्र. क. ]

महाराणी–अग, मग वाईट काय झालं!

सुमति–इश्शं! काय ग बाई ती त्यांची वागण्याची रीत! माझी प्रथम भेट झाली, त्या वेळीं काय तो त्यांचा फणकारा; पण ताईसाहेबांना पाहातांच पाण्यांत पडलेल्या मातीच्या ढेकळाप्रमाणं एकदम विरघळले मेले!

महा०–हं, किती झालं तरी ते तपस्वी आहेत; त्यांना 'मेले' म्हणूं नये; ते कधींच मरत नाहींत; भगवद्भक्त तपस्वी नेहमीं अमरच असतात!– काय म्हणालीस? तिला पाहून विरघळले? आहेच माझी बाळी तशी संदर!

सुम०—पण त्यांच्याशीं लग्न झालं, तर ताईसाहेबांना कांहीं सुख लागणार नाहीं. दोघेही आगजाळे आहेत. ताईसाहेबांनीं कुणाच्याही गळ्यांत माळ घातली, तरी त्या जन्मभर होरपळून निघाल्याशिवाय राहाणार नाहींत!

महा०–हं, असं अशुभ बोलूं नये माणसांनीं! अग, माझी श्रीमती इतकी सुंदर, इतकी गोड, इतकी लाघवी, इतकी चतुर आणि इतकी चाणाक्ष आहे कीं, तिचा नवरा साक्षात् जमदग्नि किंवा दुर्वास असला, तरी ती त्याला पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणं शांत केल्यावांचून राहाणार नाहीं! तशी आहेच माझी बाळी! अग, प्रथमतः हे थै थै नाचणारे आणि मारकट बैलाप्रमाणं ज्याच्या त्याच्या अंगावर फुसफुस करून जाणारे नवरे एखादी सुंदरशी मोहनाराणी पाहिली कीं, अगदीं गरीब गाय होऊन जातात! मग त्यांच्या नाकांत वेसण घालून त्यांना वाटेल तिकडं न्यावं! (श्रीमान प्र. क.)

श्रीमान—आणि वाटेल तर चाबकाचे फटकारेही मारावेत! आईसाहेब! मला बायको करून द्याल, ती सुंदर करून देऊं नका हो; नाहीं तर ती माझ्या नाकांत वेसण घालायची!

सुम०—सुंदर नको, तर कसली पाहिजे बायको तुम्हांला?

श्रीमा०–वेडीविद्री, नकटी काळुंद्री, कुबडी म्हातारी हवी! म्हणजे मीच तिच्या नाकांत वेसण घालून एखाद्या अस्वलाप्रमाणं तिला फिरवीन!

महा०—म्हणजे दरवेशी होणार म्हणायचे तुम्ही!—बरं पण काय ग, त्या दोघांपैकीं श्रीमतीचा कुणाकडे ओढा आहे?

सुम०—त्यांचा कुणाकडेच ओढा नाहीं !

महा०—कुणाकडे तरी ओढा असलाच पाहिजे ! खरं जर विचारशील, तर पर्वतांपेक्षां नारदच जांवई चांगले ! केवढं मोठं घराणं ? पर्वतऋषींना घर ना दार, बायकोला घेऊन फिरतील दारोदार ! छग बाई ! असला भिकार नवरा माझ्या श्रीमतीला मुळींच नको ! पण नारदांची गोष्ट तशी नाहीं. किती झालं तरी नारद गर्भश्रीमंत आहेत. त्यांचे आजोबा तर साक्षात् वैकुंठांत असतात. मग माझ्या श्रीमतीला कांहीं कमी का आहे ? मला तर वाटतं,—

[ पद ८ वें; चालः-लाखो मे गाली; तालः—केरवा. ]

॥ येई खास रमा जन्मा जनिं ॥ भाग्यसफलता होउनि जाणीं ॥ ध्रु० ॥ वंश आज हा सुगुणिं उजळला ॥ भुलति न केविं तिला बघतां मुनि ? ॥ ८ ॥

सुम०—पण मला वाटतं, असल्या फार मोठ्या आणि चमत्कारिक घराण्यांत मुलगी देऊंच नये !

महा०—कां देऊं नये ? या स्थळांत काय दोष दिसले तुला ?

सुम०—आधीं सासरा चार तोंडांचा. माणूस नुसता दुतोंडा असला, तर त्याची किती निंदा होते, मग चार तोंडांची किती होईल ? शिवाय त्याची 'कुंभार' म्हणून लोक चेष्टा करतात ! मुलगी सरस्वती तर बया लग्नच करून घेत नाहीं ! ही नणंद ताईसाहेबांच्या मानगुटीवर कायमची बसली आहे, म्हणून समजा ! थोरला मुलगा शंकर चोवीस तास पाण्याची धार डोक्यावर धरून स्मशानांत बसलेला असतो. दिराला भेटायला जायचं, म्हणजे मसणवाटीचीच वाट धरली पाहिजे ! आणि इश्श ! त्याला भेटायला जायचं तरी कसं ? सदा सर्वदा तो नागवाच असतो म्हणे !

महा०—तुझ्या या असल्या पाहाण्याच्या तऱ्हेनं जगांतली कोणतीही चांगली गोष्ट वाईट ठरल्यावांचून राहाणार नाहीं.

**सुम०**–वरं आजेसासरा सदा सापांच्या विळख्यांत पडलेला, नी धरणीखाली दडलेला! त्याची बायको तर चोवीस तास त्याचे पाय चेपीत असते. त्यालाही कंटाळा नाहीं आणि तिलाही नाहीं! त्याला चार हात आणि त्यांवर शंखचक्र पडलेलीं! असल्या या विचित्र आणि विक्षिप्त घराण्यांत ताईसाहेबांना काय सुख लागणार?

**महा०**–सुमति! सुमति! तूं फारच वात्रटपणानं बोलूं लागलीस हं! असलं स्थळ सात जन्म तप केलं तरी मिळणार नाहीं समजलीस! मी काय द्योटल तें करणार आणि नारदच जांवई होतील अशी घटना घडवून आणणार!

**सुम०**–आपण रागावलांत खऱ्या, पण आपण जरा विचार करायचा होता; ताईसाहेबांचं लग्न होऊन त्या एकदा स्वर्गांत सासरीं गेल्या कीं, पुनः दृष्टीला सुद्धां पडायच्या नाहींत! त्यांनीं कृपा करून माहेरीं लावून दिली तर दिली. त्यांना मधेंच बोलवायचा प्रसंग आला, तर कोण स्वर्गाला जाणार आणि कसं जाणार?—अगबाई,. पण या इकडे ताईसाहेबच आल्या. त्याचं काय तो निकाल देतील! लग्न कांहीं माझं व्हायचं नाहीं. व्हायचं आहे ताईसाहेबांचं!

**श्रीमा०**—तें का? तुझंसुद्धां व्हायचं आहे! आमचे तरुण, सेनापति धैर्यशील—त्यांच्याबरोबर नाहीं का ठरलं तुझं? आतां कां लाजतेस? लाजली रे लाजली! लाजरी रे लाजली! लाजेनं चिंब भिजली रे भिजली! (श्रीमती प्र. करून महाराणीला नमस्कार क.)

**महा०**—चांगला, सुंदर, सद्गुणी, तरुण, विद्वान्, श्रीमंत, पराक्रमी, नवरा मिळून भाग्याची हो हं बाळे!--बाळे! हा कसला ग नमस्कार केलास?

**श्रीम०**—मी कसं सांगू बाई? मला लाज वाटते!

**महा०**--सांग ना, लाजूं नकोस, सांगना!

**श्रीम०**--सुमति, सुमति, इकडे ये. ( तिच्या कानांत सांगते. )

**सुम०**–ताईसाहेबांचं लग्न झालं राणीसाहेब! त्याच्याबद्दलचा नमस्कार, बर का हा! पाहा आतां कशी नवी नवरी शोभूं लागली ती! दृष्टच काढावी या रूपड्यावरनं!

**श्रीमान**—काय अक्कासाहेबांचं लग्न झालं? वाद्यं नाहींत, मिरवणूक नाहीं, लाडू करंज्या नाहींत, मंगलाष्टकं नाहींत आणि लग्न कसं झालं? मी तर अक्कासाहेबांना आणि अक्कासाहेबांच्या नवऱ्याला जोरजोरानं अक्षता मारणार होतों आणि आतां त्या कशा मारायच्या बुवा?

**महा०**—काय म्हटलंस, सुमति? माझ्या बाळीचं लग्न झालं? नारदांच्या बरोबरच झालं ना? गांधर्वविवाह झाला वाटतं? छान झालं ग बाई! आधीं नुसत्या आणाभाका झाल्या वाटतं? करूं मग समारंभ! छान केलंस हं बाळे!

**श्रीमती**—आई, माझं लग्न झालं, पण नारदाशीं नाहीं.

**महा०**—तर मग कुणाशीं? त्या संन्याशी पर्वताशीं?

**श्रीम०**—छे:! त्या मंगलमय प्रभूशीं!

**महा०**—तरी वाईट नाहीं—तरी कांहीं वाईट नाहीं! कुठें आहेत ते प्रभु!

**श्रीम०**—आई, ते कुठें नाहींत असं विचार. अग, ते या स्थिर चर जगाला व्यापून उरले नाहींत का?

**श्रीमा०**—आईसाहेब, आतां आमच्या अक्कासाहेब वेदांतांत शिरलेल्या दिसतात! यांचा पति म्हणे दगडधोंड्यांत, मातींतसुद्धां भरून उरला आहे!

**महा०**—बाळीला वेड तरी नाहीं लागलं?

**श्रीम०**—होय, आई, मला वेडच लागलं आहे; मी वेडी झालें आहे, पण त्यांच्या प्रेमानं झालें आहे! आई, मी पुनः नमस्कार करतें, पण मघांसारखा आशीर्वाद देऊं नकोस बाई! अग, माझं लग्न झालं आहे. दुसरं का करायचं आहे? आतां मी पुन: नमस्कार केला कीं, त्यांचं प्रेम तुझ्यावर अखंड असो.........

**श्रीमा०**—आणि लवकर एखादं गोडसं बाळ होवो.........

**श्रीम०**—कायहो हा चाहाटळपणा?—असा आशीर्वाद दे! देशील ना आशीर्वाद?

**महा०**—अग, पण तो तुझा पति आहे कुठें? तो पाहूं दे तरी डोळ्यांनीं!

**श्रीम०**—पुनः तेंच!—माझे पति तुझ्या ठिकाणीं आहेत!

**महा०**—म्हणजे मी तुझा पति कीं, काय?

श्रीम०–ते या श्रीमानांच्या ठिकाणींही आहेत!

श्रीमा०–भले अक्कासाहेब! आपण नाहीं बुवा तुमचा नवरा व्हायला कबूल! म्हणे 'ते या श्रीमानांच्या ठिकाणीं आहेत!' कुठें आहेत ते? या अंगरख्यांत?

महा०–खचित तुला कांहीं तरी झपाटलं आहे! दृष्टच काढली पाहिजे तुझी! कोण आहे रे तिकडे?–पण नको, मीच सारी तयारी करतें. बाळ, चल बरं. सुमति, हिला इकडे तिकडे सोडूं नकोस हं, आलेंच आतां. ( जातात. )

सुम०--खरंच, ताईसाहेब, तुम्ही आतांपर्यंत काय बोललां, यांतला एक शब्दसुद्धां मला समजला नाहीं!

श्रीम०--कसं बरं समजेल तुला? कारण ही गोष्ट मी आतांपर्यंत कुणा-जवळही बोललें नव्हतें. अग, मी त्यांना कितीतरी दिवसांपूर्वी मनानं घरलं होतं!

सुम०–हे ते म्हणजे कोण? ब्रह्मदेव?

श्रीम०–छे ग, ते? वैकुंठांत असतात ते!

सुम०–अस्सं अस्सं! श्रीमहाभगवान विष्णु! हं हं, मग एकंदरींत फारच मोठं कुळ गाठलं आहे तर! मग या नारदांना कोण विचारतं ग बाई!

श्रीम०–मी लहानपणांपासून त्यांची भक्ति करतें आहे हो. रोज माझी तीन्ही त्रिकाळ त्यांच्या पायाजवळ प्रार्थना आहे कीं, 'गडे, मला एकदा पदरांत घ्यायची!' त्याप्रमाणं आत्तां हेच ते प्रगट झाले आणि त्यांनीं मला आश्वासन दिलं—आणि कित्ती कित्ती गंमत केली बाई!

सुम०--काय काय झालं ते सांगा तरी ताईसाहेब!

श्रीम०--मी नाहीं बाई सांगत!-कसले ग बाई ते धीट? त्यांनीं आपली मला एकदम अश्शी हृदयाशीं धरली! कीं नाहीं, त्यांनीं जेव्हां मला आपल्याकडे ओढली, त्या वेळीं बाई माझा जीव घाबरा घुबरा होऊन मी थरथर कांपूं लागलें आणि आपलं असं तोंडाजवळ तोंड नेऊन—

सुम०—इश्श! हें काय?

श्रीम०—अश्शी!—अश्शीच दूर झालें मी त्यावेळीं लाजेनं, आणि रागानं त्यांना म्हणालें, 'लग्नाच्या आधीं हें काय?' तेव्हां ते म्हणाले, 'हृदयाला हृदय मिळालं, तेव्हांच लग्न झालं; आतां कसलं लग्न?' खरंच नाहीं का त्यांचं? लग्न वाद्यांनीं होत नाहीं; लग्न दागिन्यांनीं होत नाहीं; लग्न मंडप गुड्यातोरणांनीं होत नाहीं; लग्न हृदयांनीं होतं!—

[ पद ९ वें; चालः—प्रथम सुमर० तालः—एका.. ]

**प्रथम हृदय मान्य त्यास ॥ भावहर प्रभुवरास ॥ म्हणुनि वनत सुजनदास ॥ ना नटांस थारा ॥ ध्रु० ॥ दंभ विफल किंति कराल ॥ श्रम करासि लाभवाल ॥ त्या प्रिय जरि शुद्ध चाल ॥ प्रेम सुरसधारा ॥९॥**

हा सारा प्रकार झाला झोपाळ्यावरचीं गाणीं आटोपल्यावर. पण त्याच्या आधीं एक निराळीच गंमत झाली!—

सुम०—काय काय झाली?

श्रीमा०—अगबाई! पण ती पाहा आई आली! आतां कसं सांगू बाई!

( महाराणी व श्रीमान प्र. क. )

श्रीमा०—चला अक्कासाहेब! तुमच्यावरून मीठ, मोहऱ्या आणि मिरच्या ओवाळून टाकायच्या आहेत!

महा०—चल श्रीमती. दृष्टीची तयारी करून टेविली आहे तुझी. तसंच त्या याला म्हणावं, त्या देवऋषींना बोलावून आणा. म्हणजे, ते कांहीं तरी मंत्रतंत्र करतील!

सुम०—बरं आहे. सांगतें! ( जातात. )

महा०—चल बाळ. चल रे श्रीमान! ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

[ स्थळः— राजमंदिर; पात्रें:—राजा अंबरीष आसनस्थ. ]

द्वारपाल—( प्रवेश करून ) सूर्यकुलभूषण, परमभागवत अंबरीष महाराजांचा विजय असो!

**अंबरीष**–द्वारपाल, पुकारा कां केलास?

**द्वारपाल**-बाहेर द्वारावर ब्रह्मर्षि पर्वत आणि देवर्षि नारद आले आहेत.

**अंब०**–वेड्या, मग त्यांना तावडतोब इकडे घेऊन यायचं कीं, सामान्य लोकांप्रमाणं असं थोपवून धरायचं? लक्ष्यांत ठेव, हरिभक्तांना माझ्या मंदिरांत केव्हांही प्रतिबंध नाहीं. माझ्या मंदिराचीं द्वारं त्यांना केव्हांही उघडीं आहेत. जा त्यांना त्वरित इकडे घेऊन ये. (तो जातो व त्यांना आणतो.)

**द्वार०**–असं इकडून यावं महाराज! (राजा नमस्कार करणार तोंच—)

**नारद**–थांबा, अंबरीष महाराज! थांबा! मला नमस्कार करूं नका; वास्तविक मीच हा असा तुम्हाला नमस्कार केला पाहिजे! (नमस्कार करतो.)

**अंब०**–देवर्षे! देवर्षे! आपण हें काय करतां?

**पर्व०**–कांहीं नाहीं योग्य तेंच करीत आहे! नातंच असं निर्माण झालं आहे कीं, आतां तुम्ही मला नमस्कार न करतां, मीच तुम्हाला असं नम्र वंदन केलं पाहिजे! (वंदन क.)

**अंब०**—पर्वत ऋषे! आपण काय हें चालविलं आहे? धर्माश्रमाला विरुद्ध असं हें आचरण जर माझ्या नशीबीं आलं, तर मला मोक्ष मिळण्याची कधींच आशा नाहीं! महाराज! मी आपले घट्ट पाय धरतों, मला एवढी भीक घाला, आपण असं उलटं वर्तन कधींच करीत जाऊं नका! अशानं मला दुर्गतींत मात्र पडावं लागेल! (वंदन क.)

**नार०**–छे, छे! महाराज, आपण वंदन करूं नका; मीच आपल्याला वंदन करणार! (नमस्कार क.)

**पर्व०**–नाहीं, नाहीं, मी आपल्याला वंदन करणार! (वंदन क.)

**अंब०**–महाराज, हे असे माझे हाल करण्यापेक्षां माझा शिरच्छेदच कां करीत नाहीं? आपण माझ्यापुढें मस्तक नम्र केलंत, पण मला जिवंतपणींच मेल्यापेक्षां पलीकडे झालं आहे! पर्वतऋषे! आपण तरी हें काय बरं करूं लागलां? करूं नका, हात जोडतों, पुनः असं करूं नका! (दोघे पुनः नमस्कार क.) देवा, नारायणा!..मी मागील जन्मीं कोणतं पातक केलं होतं, म्हणून या दोघां महात्म्यांचं वंदन स्वीकारण्याचं माझ्या दैवीं लिहिलंस?

पर्व०-महाराज, आपण वाईट वाटूं देऊं नका. माझं लग्न ठरलं आहे नव्हे, जवळ जवळ झालंच आहे आणि आपण माझे...

नार०-माझे सासरे झाला आहांत! म्हणून मी हें आपल्याला वंदन करीत आहे! जांवयानं सासऱ्यालाच केव्हांही वंदन केलं पाहिजे नाहीं का? आतां मी नारद आणि आपण अंबरीष असं नुसतं साधं नातं राहिलं नसून, आपण सासरे आणि मी आपला जांवई असं नाजुक नातं निर्माण झालं आहे; म्हणून मी आपल्याला...

पर्व०-म्हणूनच मी आपल्याला नमस्कार केला! आतां यापुढें मी आपल्याला नमस्कार करायचा आणि आपण घ्यायचा! का आलं कां लक्ष्यांत?

अंब०-महाराज, मी भ्रमिष्ट झालों आहे; माझ्या कांहींच लक्ष्यांत आलं नाहीं!

नार०-आपल्या सुंदर, सुकुमार श्रीमतीवर माझं प्रेम जडलं आहे!

पर्व०-म्हणूनच मी आपल्याजवळ तिला मागणी घालायला आलों आहे!

अंब०-हां, आत्तां थोडासा माझ्या डोक्यांत प्रकाश पडला! माझ्या मुलीशीं लग्न करणार तें आपण कीं, आपण?

नार०-आपल्या मुलीशीं मी लग्न करणार आहें!

पर्व०-नाहीं, आपल्या मुलीशीं मी लग्न करणार आहें!

अंब०-कांहीं हरकत नाहीं. असा योगायोग जुळून आला, तर त्यांत मला आनंद आहे. पण, महाराज, मला मुलगी एकच आहे!

नार०-मग मला तरी दोन बायका कुठें हव्या आहेत! मला एकट्या श्रीमतीशींच लग्न करायचं आहे!

पर्व०-माझंही तेंच म्हणणं; मला एकट्या श्रीमतीशींच संसार करायचा आहे; मला नकोच आहेत दोन बायका!

अंब०-उभयतामहाराज, पहिला प्रश्न असा कीं, दोघांपैकीं कुणाला तरी एकाला माझी मुलगी द्यायला मी एका पायावर तयार आहे. पण याबद्दल मुलीचीही अनुमती घ्यायला नको का? मुलगी लहान असती,

म्हणजे हा प्रश्नच नव्हता. पण आतां ती चांगली जाणती, तरुण झाल्या कारणानं तिचा विचार घेतल्यावांचून तिचं लग्न मला ठरवितां येणार नाहीं!

**नार०**--ती अल्लड पोर, तिची अनुमति कसली घ्यायची?

**पर्व०**--पहिल्यांदा वृक्षावर न चढलेली वेल दोरीनं आवळून बांधली कीं, कांहीं दिवसांनीं त्याला कायमचा विळखा घालून बसते!

**नार०**--त्याप्रमाणं माझ्या हातांत हात देतांना ती कदाचित् तोंड वाकडं करील...

**पर्व०**--पण नंतर माझ्याशीं सुरळीत संसार करील!

**अंब०**--जिला जगांतले व्यवहार कळूं लागले आहेत, ती अल्लड पोर कशी! मुलीचं लग्न स्वतः पित्याला करायचं असेल, तर तें तिच्या लहान-पणींच केलं पाहिजे; पण ती तरुण झाल्यावर मात्र पतीची निवड तिच्या मनावर सोपविणं हें न्यायाचं आहे; हें नैसर्गिक आहे! याविरुद्ध वर्तन करणारा पिता शस्त्रावांचून आपल्या पोरांचा गळा कापतो, असं माझं प्रामाणिक मत आहे!

**पर्व०**--बस्स, तें कांहीं नाहीं; तिचं मत समजून घेण्याची मला मुळींच जरूरी नाहीं!

**नार०**--माझं मन तिच्यावर जडलं आहे ना? बस्स? लग्न करायला एवढं निमित्त पुरें आहे! पति हा स्त्रियांचा देव आहे; देवाची आज्ञा—

**पर्व०**--या नारदाची आज्ञा म्हणजे ती खरोखरीच श्रीमतीची देवाज्ञा!

**अंब०**--गुलामगिरी नष्ट करण्याकरितांच धर्माचा अवतार आहे नाहीं का? आसुरी संस्कृति फुलून चोहोंकडे जेव्हां उन्मत्तपणाचा धिंगाणा घालूं लागते, विश्वाकाशांत स्वातंत्र्यसूर्याचा अस्त होऊन पापाच्या काळोखांत जेव्हां मानसिक आणि शारीरिक भेसूर अत्याचार यथेच्छ नृत्य करूं लागतात, तेव्हांच तो धर्मरक्षक आणि न्यायनीतिमान परमेश्वर अवतार घेतो ना? आणि त्याच वेळीं परमेश्वरी कार्याचा गौरव करण्याकरितां साधु-सत्पुरुष निर्माण होतात ना? त्याच वेळीं धर्मस्थापना होऊन अन्यायांचा नायनाट होतो ना? या गोष्टी आपल्याला माहीत आहेत; आपण आतां

पर्यंत याच गोष्टीचा विस्तार करीत आला आहांत; आणि आतांच आपला मार्ग सोडून...

**नार०**–माझा मार्ग मी मुळींच सोडला नाहीं!

**अंब०**—मुलीची इच्छा असो वा नसो, तिच्याशीं जबरदस्तीनं लग्न करण्याची इच्छा आपण दोघेही प्रकट करीत आहांत, हा न्यायाचा आणि धर्माचा मार्ग सोडणं नव्हे काय? (राणी व श्रीमान प्र. क.)

**महाराणी**–आपली श्रीमती तशी कांहीं वेडी नाहीं. आधीं ती मुळीं आपल्या उलट जायचीच नाहीं; आणि गेली तर तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या म्हणजे झालं. तशी ती आज्ञाधारक आहे हो!

**श्रीमान**–मुळींच नाहीं, यांच्याशीं लग्न करायचं अक्कासाहेबांच्या मनांत मुळींच नाहीं! यांच्यावर म्हणे प्रेमच नाहीं त्यांचं!

**महा०**–हें काय मधें असं बोलणं हें? पोराला काय कळतं? माझी पोर कांहीं इकडच्या उलट जायची नाहीं—

**श्रीमान०**–अक्कासाहेब म्हणतात, 'यांच्याशीं माझं लग्न झालं, तर मी मरेन!'

**नार०**–बरोबरच आहे तिचं म्हणणं. लग्न झालं कीं, कन्या माहेरीं मरून सासरीं तिचा नवा जन्म होतोच!—

[ पद १० वें; चालः–खडा है देशसे; ताल–केरवा. ]

**॥ वराच्या करीं कर देतां वधु लोकीं स्वतां नुरे ॥ पतीच्या प्रेममय रूपीं मिळोनी त्या क्षणीं जाते ॥धृ०॥ आर्यधर्मीं मानिलें हें, म्हणोनी मानि जन नातें ॥ सागराला मिळे सरितां, पहा मग काय होतें तें ॥ १० ॥**

**पर्व०**--कन्येचं लग्न झाल्यानंतर तिचं दुसरं बारसं करून नांव बदलतात, यात तरी हेंच रहस्य आहे!

**महा०**–मला वाटतं, नारदासारखं हातचं स्थळ सोडूं नये. सोयरीक कुणाशीं होणार आहे, इकडं लक्ष्य द्यावं! इतकं सुंदर, इतकं वैभवशाली स्थळ हुडकूं गेलं तरी मिळणार नाहीं!

**पर्व०**--नारदाप्रमाणं श्रीमंतीच्या ऐत्या पीठावर रेघा ओढणारा मी अजागळ श्रीमंत नाहीं. तुमची मुलगी माझ्या पदरांत टाका, मी माझ्या तपाच्या जोरावर प्रति स्वर्गभुवन निर्माण करून त्यांत तुमच्या मुलीला नांदवितों!

**नार०**--पण मी गर्भश्रीमंत आहे आणि हा पर्वत जन्मदरिद्री आहे!

**पर्व०**--गर्भश्रीमंत होणं, ही गोष्ट फारशी अवघड नाहीं; पण गर्भश्रीमंती निर्माण करणं, हे मात्र हिमतीचे खेळ आहेत! मी गर्भश्रीमंत नसलों, तरी माझ्या पराक्रमाच्या जोरावर माझीं मुलं गर्भश्रीमंत होतील, अशीच परि-स्थिति मी निर्माण करीन!

**नार०**--माझं कुल देवांचं अर्थात् उच्च आहे; माणसांचं नाहीं!

**पर्व०**—नराचाच नारायण होत असतो. मलाही सहकुटुंब देव बनतां येणार नाहीं असं नाहीं!

**श्रीम०**—तुम्ही नर बना किंवा तुम्ही वानर बना, तुम्ही देव बना किंवा तुम्ही दानव बना; पण अक्कासाहेबांनीं तुमच्याशीं लग्न करायला हवं ना?

**अंब०**--श्रीमान! तूं आपली पायरी सोडून बोलतो आहेस; पण हें आमच्या कुळाला योग्य होत नाहीं! सज्जनांची अमर्यादा करणं हें सूर्य-वंशाचं ब्रीद नाहीं!

**महा०**—पोराला काय कळतं? याची आणि यांची म्हणे मघाशींच गट्टी जमली आहे. हें कांहीं असं पहिल्यानंच बोलत नाहीं हा!

**नार०**--महाराज, तुम्ही आपली मुलगी मला देणार कीं, नाहीं?

**पर्व०**--मीही तेंच विचारीत आहें; मुलगी मला देणार कीं, नाहीं?

**नार०**--माझी ठाम कल्पना आहे कीं, तुमच्या मनांत मला मुलगी द्यायची नाहीं आणि म्हणूनच तुम्ही तिच्या अनुमतीचं ढोंग करीत आहांत!

**पर्व०**--पण या सबबी मला ऐकून घ्यायच्या नाहींत. तुमच्या मुलीनं माझ्याच गळ्यांत माळ घातली पाहिजे!

**अंब०**--पण मी एक मुलगी दोघांना कशी देऊं? आणि त्यांत तिची अनुमती...

**नार०**–अनुमतीची पर्वा नाहीं! मनाविरुद्ध लग्नामुळं रडून रडून ती सुकली आणि सुकून सुकून शेवटीं मेली तरी हरकत नाहीं!—

**पर्व०**–तरी हरकत नाहीं!—मनाविरुद्ध लग्नामुळं ती मेली तरी हरकत नाहीं! तिच्या प्रेताशीं लग्न लावीन, पण माझी प्रतिज्ञा पुरी करीन! तीच मला पत्नी पाहिजे! आतां याला अटीतटीचं स्वरूप प्राप्त झालं आहे! इकडचं ब्रह्मांड तिकडे करीन, पण श्रीमती मिळवीन!

**नार०**–मला श्रीमती मिळाली नाहीं, तर तुला शापून भस्म करीन!

**पर्व०**–मला श्रीमती मिळाली नाहीं, तर, राजा, तुलाच काय पण तुझ्यासहित साऱ्या घरादारांला, बायकामुलांना, साऱ्या राष्ट्राला जाळून पोळून टाकीन!

**अंब०**–माझ्या मुलीनं आपल्याला वरण्याचा रुकार दिला नाहीं, किंवा रुकार देऊनही आपल्यांपैकीं कुणीतरी एकानं तिला वरण्याचा हट्ट सोडला नाहीं, तर मला आपल्या शापाच्या वणव्यांत जाळून घेणं भाग आहे! शरीराची राखरांगोळी उडाली, तरी हरकत नाहीं; पण मी माझ्या मुलीवर लग्नाची जबरदस्ती करणार नाहीं किंवा एक मुलगी दोघांना देण्याचा निंद्य मार्गही स्वीकारणार नाहीं! करा, या हतभागी राजाला खुशाल जाळून भस्म करा!

**महा०**—नका, संतमहाराज, असे निर्दय होऊं नका! साधुसत्पुरुष फुलासारखे कोमल असतात आणि महाराज, आज आपण असे वज्रासारखे कठोर कसे झालांत? आपण समर्थ आहांत; काय वाटेल तें कराल; पण आपल्या सासूसासऱ्याला ठार करून, सासुरवाडीची राखरांगोळी उडवून, त्या स्मशानांत आपलं लग्नाचं मंगलकार्य उरकणं तरी आपल्याला काय भूषण वाटतं? 'भगवद्भक्तांचे पाय घराला लागले कीं, पापं जळून जातात' असं म्हणतात; पण आज पापाऐवजीं आम्हीच जळून गेल्यावर जगांत आपली कीर्ति होईल कीं, अपकीर्ति होईल?

**नार०**–बस्स! श्रीमती!–माझ्या हृदयांतले सारे कोमलभाव दहन झाले आहेत! माझी मंजुळ वीणा मोडून तिचा यमदंड बनला आहे! श्रीमतीचा

हात हातांत घेण्याकरितां साऱ्या जगाचा चुराडा उडवावा लागला तरी हरकत नाहीं; तो उडवीन, पण तिचं पाणिग्रहण करीन! राजा! चल बोलाव श्रीमतीला!

पर्व०–राजा! चल, बोलाव श्रीमतीला! नारद तिच्या हाताला कसा हात लावतो, तें मला पाहायचं आहे! माहीत नाहीं, मुळापासून हात उखडून काढीन तो! याच्या वतींनं लढण्याकरितां प्रत्यक्ष ब्रह्मदेव येवोत, शंकर येवोत कीं, विष्णु येवोत, त्या सर्वांशीं सामना द्यायला हा पर्वत तयार आहे!–राजा! चल, बोलाव श्रीमतीला!

श्रीमा०–नका हो महाराज, आमच्या बाबासाहेबांच्यावर आणि आईसाहेबांच्यावर असे रागावूं नका! मी आक्कासाहेबांच्या हातापायां पडतों आणि त्यांच्याकडून लग्नाची कबूली घेतों; पण आपण रागावूं नका हो!

नार०–चल, बाजूला हो रे पोरट्या! नाहीं तर लाथ मारीन डोक्यांत समजलास!

श्रीमा०–महाराज! आपण तरी?–

पर्व०--बाजूला होतोस कीं, नाहीं! कां करूं डोक्याचा चुराडा?-- राजा! माझी आज्ञा अमलांत आणायची नाहीं, तर चल मरायला तयार हो!

नार०--चल, तयार हो मरायला!

अंब०--जगद्रूपानं नटणाऱ्या जगन्नाथा! तुला हा माझा शेवटचा प्रणाम घे!--येतों, मंडळी हो, येतों!

महा०--पण असं काय करायचं तें? मुलीचं काय मत आहे, तें तरी पाहावं!

अंब–श्रीमान खोटं बोलणार नाहीं! मी मुलीच्या विरुद्ध मुळींच जाणार नाहीं! चला, करा माझं जाळून भस्म!

श्रीमा०–बाबा! मीही तुमच्याबरोबर येणार! करा, माझीही राखरांगोळी करा!

पर्व०--ठीक आहे! व्हा तर तयार घरादारांसहित मरायला!

( सुमतीसह श्रीमती प्र. क. )

श्रीमती—नका, कुणीही राखरांगोळी करूं नका ! राखरांगोळी पापाची करायची असते; राखरांगोळी दुष्ट मनोवृत्तींची करायची असते. राखरांगोळी सज्जनांची करायची नसते !—बाबा ! माझ्या लग्नाच्या स्वातंत्र्याकरितां तुम्ही सहकुटुंब मरायला तयार झालांत, पण घरादारांसहित आईबापांना रसातळाला नेणारं हें असलं अशुभ स्वातंत्र्य तरी मला काय घेऊन करायचं आहे ?--या दोघांवर माझं प्रेम नाहीं, ही गोष्ट जरी खरी असली, तरी आपल्या-सारख्या सज्जनांचा संहार टळावा आणि राष्ट्राचा नाश होऊं नये, म्हणून या दोघांपैकीं एकाशीं लग्न लावायला मी तयार आहें !

अंब०--नको, बाळे, मला जिवंत राखण्याकरितां आपल्या मनाला मारूं नकोस--ही प्रथा पाडूं नकोस !

श्रीमती—बाबा ! माझी काळजी आपण मुळींच करूं नका ! आपण मात्र सज्जनांचा सत्कार करण्याकरितां अखंड जगा !--सूर्यवंशाची उज्वल परंपरा राखण्याकरितां अखंड जगा !--निदान चिमुकला श्रीमान तरुण होई-पर्यंत तरी जगा !

नार०--श्रीमती ! तूं मला वरलं पाहिजेस !

पर्व०--नाहीं, श्रीमती ! तूं मला वरलं पाहिजेस !

श्रीम०--मी एकटी आहे, दोघांना कशी वरूं ?

सुम०--मीही माझं मन मारून, सर्वांना सुख व्हावं म्हणून सांगतें, मी अमात्यकन्या असून कुमारी आहे; एकांनीं ताईसाहेबांचा स्वीकार केला आणि एकांनीं माझा केला, तर सर्वांचीच संकटांतून सुटका होणार आहे; तर महाराज !—

नार०--चल, दूर हो ! मला श्रीमतीच पाहिजे !

पर्व०--मलाही श्रीमतीच पाहिजे; तुझी जरूरी नाहीं !

श्रीम०--मी एकटी आहे, महाराज ! मी एकटी आहे ! मी एकटी आहे, यावरचा उपाय कुणाच्याच हातांत नाहीं ! वास्तविक माझं हृदयानं तिस-ऱ्याशींच लग्न झालं आहे. आज केवळ मी माझं शरीर तुमच्या पदरांत टाकायला तयार झालें आहे ! आज मी माझ्या माहेराकरितां आणि राष्ट्रा-

करितां व्यभिचारिणी बनून नरकांत पडायला तयार झालें आहे! एकाच व्यक्तीचा अधःपात होईल, पण अनेक जीव सुखी होतील! पुष्कळांचं पुष्कळ कल्याण करण्याकरितां मी माझ्या पतिव्रत्याचा बळी दिला आहे! एवीतेवीं मी भ्रष्ट होणार आहे, मग दोघांना वरायला काय हरकत आहे?–आपली इच्छा असली तर मी दोघांनाही वरायला तयार आहे! नाहीं तर ही घ्या कट्यार मला उभी चिरा आणि माझे दोन तुकडे दोघे-जण वाटून घ्या! याशिवाय तिसरा उपाय नाहीं!

**अंब०**– नाहीं, बाळे, मी माझ्या क्षुल्लक जिवाकरितां तुला कधींही भ्रष्ट होऊं देणार नाहीं! मी जळेन तर मला मृत्यूच प्राप्त होईल; पण बाळे, तूं भ्रष्ट झालीस, तर तुझा मात्र अधःपात होईल.

**श्रीम०**–मी जर खरी पतिव्रता असेन, तर माझ्या पतीशिवाय माझा हात धरण्याची या जगांत कुणाचीही छाती नाहीं! तशी नसेन तर मग मी भ्रष्टच आहे, मग यांना वरून राष्ट्राचं मंगल केलेलं काय वाईट? चला, महाराज, करा माझे तुकडे आणि घ्या वाटून!

**महा०**–महाराज, श्रीमती आपणां दोघांपैकीं कुणालाही वरायला तयार झाली, हें निम्मं फळ पदरांत पडलं आहे. आतां आपण हें असलं कधींच न सुटणारं कोडं न घालतां हिच्या हातांत नवरत्नांचा हार द्यावा आणि ही ज्यांच्या कंठांत तो घालील, त्यांनीं हिला वरावं असं मला वाटतं. वरण्याचं स्वातंत्र्य आपल्याकडे न ठेवतां हिच्याकडे द्यावं, म्हणजे सर्व गोष्टी सुरळीत होणार आहेत! ( नारदास हळूच ) नारदा, आपण या गोष्टीला मुकाट्यानं रुकार द्या; श्रीमती आपल्यालाच वरील अशी मी तजवीज़ करीन!

**सुम०**–छान, राणीसाहेबांनीं ही छान युक्ति काढली! (पर्वतास हळूच) पर्वत ऋषे, ही गोष्ट मुकाट्यानं मान्य करा; श्रीमती आपल्याच कंठांत हार घालील अशी मी व्यवस्था करीन!

**नार०**–कबूल, या गोष्टीला मी कबूल आहे!

**पर्व०**–मीही या गोष्टीला तयार आहें!–राजा, उदईक याच वेळीं श्रीमतीचं स्वयंवर होईल!–सारी तयारी असं दे!

**नार०**–येतों, राजा, येतों आम्ही! ( एकमेकांवर गुरगुरत जातात. )

**अंब०**–सूर्यवंशांतल्या कुमारीवर जारिणीच्या जिण्यावर जगण्याचा प्रसंग यावा, यापेक्षां दुर्दैव तें कोणतं? देवा नारायणा! काय हा माझ्यावर प्रसंग आणलास?

**श्रीम०**–बाबा, आपण मुळींच काळजी करूं नका. आपण जर खरे देवभक्त असाल, मीं जर खरं खुरं सतीच व्रत घेतलं असेल, तर ती सारी पुण्याई एकवटून या मार्ग चुकलेल्या सज्जनांच्या डोळयांत अंजन घालील; आपल्याला दुःखमुक्त करील; आणि माझं पातिव्रत्य अभंग राखीलच राखील!

**श्रीमान**–आक्कासाहेब! असंच होणार!–तो प्रभु असंच करणार!!–

( पद ११ वें; चालः– प्रभु तेरि दया० तालः–त्रिताल. )

**प्रभुमनिं दया का नसे त्या? ॥ तो सुजनसखा नित; सुखयुत झणिं करित; हृदयिं प्रेम वसे, क्षीण न लवसें ॥ ध्रु० ॥ दीनदयाळ विकलगणरक्षण ॥ त्वरित करायां, सतनु जगतीं ॥ येत असे; मग नीच फसे! ॥ ११ ॥**

---

ग्रंथ संग्रहालय
वा. ना. नं. ७... 
ता. २१-११-३३
ठाणें.

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

[ **स्थळ**ः–श्रीमतीचें मंदिर; **पात्रें**ः–श्रीमती व श्रीमान आंधळी कोशिंबीर खेळत आहेत. ]

**श्रीमती**—पकडलं कीं, नाहीं तुम्हाला? तुम्हाला आपल्या चपळपणाची घमेंड होती नाहीं? पण तुमचं बारसं जेवलें आहे म्हटलं मी!

**श्रीमान**—आहारे! मग यांत काय नवल? तुमच्या आधीं मी जन्माला आलों असतों, म्हणजे मीही तुमचं बारसं जेवलों असतों!

**श्रीम०**–पण या जन्मीं तरी तें आतां शक्य नाहीं! म्हणतात ना, 'आत्याबाईला मिशा असत्या, तर...'

**श्रीमा०**–'तर काका म्हटलं असतं!' पण मनी मांजरीला मिशा असल्या तरी कुणी बोका म्हणत नाहींत!—हं, चला, ताईसाहेब, बांधा माझे डोळे. आंधळी कोशिंबीर झटकन कालवूं दे मला! ( त्याचे डोळे बांधते; दोघे खेळूं लागतात; अंबरीष येऊन मध्यें उभा राहातो; श्रीमान त्यालाच शिवतो; तो त्याला उचलतो. ) अरे बापरे! अरे बापरे!

**अंबरीष**—होय खरोखरीच बाप रे!

**श्रीमा०**–( डोळ्यावरचा शेला सोडून ) बाबासाहेब, तुम्ही होय? मी म्हटलं, आक्कासाहेब एवढ्या मोठ्या केव्हां झाल्या आणि त्यांना या मिशा केव्हां आल्या?

**अंब०**–अरे लबाडा! तूं माझीही थट्टा करूं लागलास का?–बरं असो; चला खेळूं लागा आंधळीकोशिंबीर. मध्यें माझा आणि अडथळा नको!

**श्रीमा०**–नाहीं, बाबासाहेब, आम्ही केव्हांपासून खेळत आहोंत. हा आमचा शेवटचा डाव आहे आणि आतां तो संपलाच म्हणायचा!

अंब०–( बसून ) श्रीमती, मनाविरुद्ध वरण्याचं संकट तुझ्यापुढें उभं असतांनाही तुला असले करमणुकीचे खेळ सुचतात, तेव्हां धन्य आहे तुझ्या स्थितप्रज्ञतेची! मला तर तुझ्या दुर्दशेच्या दुःखामुळं अन्नपाणीही गोड लागेना!

श्रीम०–मी ज्यांच्यावर भार टाकला आहे, ते माझी सर्व काळजी दूर करायला समर्थ असतांना मी कां बरं भ्यावं, बाबा?

अंब०–बाळे, तुला विचारणं जरा चमत्कारिक होणार आहे; तरी पण विचारतोंच; तूं कुणाला वरलं आहेस? ( ती लाजते. ) आम्हांला तरी कळलं पाहिजे ना? तुम्ही दोघांनीं एकमेकांचं लग्न ठरविलंत, पण तें साजरं आम्हांलाच केलं पाहिजे ना?—सांग, लाजूं नकोस, सांग ना!

श्रीमा०–बाबासाहेब, नवऱ्याचं नांव विचारलं कीं, या पोरी अशाच लाजून लाल होतात! मी नाहीं बायकोचं नांव सांगायला लाजणार! ज्या गांवाला जायचं, त्याचं नांव सांगायला लाज कसली.

श्रीम०–हो, तुमच्या सारखींच कुठें सारीं धीट आहेत?

अंब०–सांगना, लाजायचं काय त्यांत? सांग सांग!

श्रीम०–सांगीन म्हणतें, पण–नाहीं बाई!—तोंडाचं कुलूप निघतच नाहीं!–हातानं लिहून दाखवूं का?

श्रीमा०–ते तरी मोकळे आहेत का? का तेही हातबेड्यांनीं जखडले आहेत?

अंब०–बहिणीला भाऊ कसा छान शोभतो आहे!—बरं लिहून दाखीव.

श्रीम०– ( लिहिते. ) हें घ्या बाबा. मी जरा तिकडे जाऊन येतें हं!

अंब०–तूं बैस ना. तुझ्यासमोरच वाचतों मी.

श्रीमा०—आणा माझ्याकडे. मी वाचून दाखवितों बाबासाहेबांना.

श्रीम०—घ्या हें! ( देते व जाते. )

श्रीमा०—आक्कासाहेब लाजून निघून गेल्या, पण आत्तां आणतों पाहा त्यांना माझ्या जादूमंत्रानं परत! छूः मंत्र! छूः मंत्र! छूः मंत्र!—वाचतों हें बाबासाहेब. ( वाचतो. ) बाबा, तुम्हाला मी असें साफ बजावितें कीं, मी महाभगवान् विष्णूंस वरिलें आहे. तुम्ही त्याला नको म्हणणारे कोण टेकोजी?

जर आमच्या लग्नांत बिब्बा घालाल, तर याद राखून ठेवा! मी त्यांच्या-बरोबर पळून जाईन! हो, कध्धीं सोडायची नाहीं! आमची खूपच लांबलचक वरात काढा! काढा म्हणजे औषधी काढा नव्हे हो! ( श्रीमती येते व कागद हिसकावून घेते. )

**श्रीमती**:-हें काय युवराज? किती बालटपणा करायचा? असं का लिहिलं आहे मी? करायचं म्हणजे फारच करायचं!

**श्रीमान**:-हें तुमचं लिखाण वाचलं नाहीं मी; तुम्हाला इकडे आण-ण्याचा मंत्र म्हटला हा! आतां तुम्ही बसा इथें. पाहा कसं बरोबर वाचतों मी तें!

**अंब०**-बैस श्रीमती. ( ती बसते. ) वाच, बाळ, सरळ वाच हं!

**श्रीमान**-' मी मना नंमहाभग वानवि ष्णूंनाव रिलें आहे. प्रगटहो ऊनत्यांनीं सर्वसं कटेंनि वारणक रीन असेंआ श्वासन दिलें आहे! '

**अंब०**-आं? काय लिहिलं आहेस श्रीमति, हें? मला एक अक्षरही कळलं नाहीं!

**श्रीम०**-युवराजांनीं आपल्या अचाट बुद्धिमत्तेनं असे शब्दांचे तुकडे केल्यावर त्यांत अर्थाचा प्राण राहातो आहे कशाला?

**अंब०**-असं असं. आण पाहूं श्रीमान तें. ( घेतो व वाचतो. ) काय? तूं महाभगवान् विष्णूंना वरलं आहेस आणि त्यांनीं तुला वरीन असं आश्वा-सन दिलं आहे? आहाहा! खरोखर माझ्यासारखा कुणी भाग्यवान् असेल का? प्रत्यक्ष भगवंत माझे जांवई होणार! श्रीमती, बाळे, आज आमच्या कुलांत येऊन तूं सर्वांचा उद्धार केलास! जन्मानं आम्ही तुला वडील, पण तूं कर्मानं आम्हांलाच काय, पण जगालाही वडील झालीस!--बाळे, तूं जगज्जननी बनलीस!

**श्रीम०**-बाबा, आपण मला स्वयंवराचं स्वातंत्र्य दिलंत, पण मी त्याचा दुरुपयोग नाहींना केला? आपण माझ्यावर विश्वास टाकलांत, पण मी त्याचा घात नाहींना केला? आपला आनंद तोच माझा आनंद. मी यांत सर्व कांहीं भरून पावलें.

**अंब०**—आईबापांना दुःखांत ढकलणारीं पोरं जिवंत असलीं, तरी तीं त्यांना मेलेलींच असतात; पण आईबापांच्या सुखाकरितां मरणारीं पोरं मरूनही चिरंजीव होतात ! पिता आपल्या संततीला चिरंजीव म्हणतो; पण बाळे, आज तूं मलाही न साधणारं कार्य करून आपल्याबरोबर मलाही कीर्तिरूपानं चिरंजीव केलं आहेस !

**श्रीम०**—बाबा, यांत मी अधिक काय केलं ? देव भावाचा भुकेला आहे, असं आपणच ना मला शिकविलंत ? त्याचंच फळ हें आज आपल्या पदरांत पडत आहे. आपण डोळे दिलेत, म्हणूनच तर ही सुरम्य सृष्टि मला दिसते आहे ना ?

**अंब०**—नाहीं, बाळे, आम्ही तुला आमची कन्या समजत आहोंत, पण ती चूक आहे. तूं साक्षात महालक्ष्मी आहेस ! श्रीमहाभगवान् विष्णूंची लाडकी कमला आहेस ! मागील जन्मीं मी कांहीं तरी फार मोठं सुकृत केलं असलं पाहिजे; त्यामुळं तूं माझी कन्या झालीस आणि साक्षात् भगवंतांचा श्वशुर होण्याचं भाग्य तूं मला लाभविलंस ! लक्ष्मीशिवाय वरण्याचं भगवंत कुणालाही वचन देणार नाहींत ! जगज्जननी ! आतांपर्यंत कन्या समजून आम्ही तुझ्याशीं वागलों याबद्दल तूं आम्हांला क्षमा कर आणि हें भाववंदन स्वीकारून आमचा उद्धार कर !

**श्रीम०**—बाबा ! बाबा ! काय हें ? गंगा वैकुंठनाथांच्या पायांवर मस्तक ठेवते; भगवान् कधींही मस्तक ठेवीत नाहींत ! आपल्या चरणाची धूळ मी ! आपण मला नमस्कार करायचा नाहीं !—

(पद १२ वें; रागः— कर्नाटकी० तालः—अद्धा.)

**सलतें मना, किति यातना ॥ प्राणा उरे लव जीव ना ॥ ध्रु० ॥**
**उलटें करायां, जरि सिद्ध राया ॥ तरि ही स्वकाया ॥ त्यजिलीच माना**

**अंब०**—तूं जगज्जननी, श्रीभगवंताची अर्धांगी, त्यांची चित्कला आहेस ! त्यांची वीरश्री, त्यांची स्फूर्ति तूंच आहेस ! त्यांची विश्रांति, त्यांची कीर्ति, तूंच आहेस ! तुझ्या पायावर मस्तक ठेवण्याचं भाग्य मला लाभूं दे !

**श्रीम०**—बाबासाहेब, यदाकदाचित् मी लक्ष्मी असलें, तरी आपल्यासारख्या साधुसज्जनांची ते सेवा करतात ना ? साधु जगाचे दास असतात,

पण जगन्नाथ सज्जनांचा दास असतो! त्या दासाची मी दासी! बाबा, आपल्यासारख्या संताच्या चरणाची धूळ भालीं शोभली, तर स्वत:ला धन्य समजणारी मी त्या संतदासाची दासी आहे!

अंब०–भगवंताची पट्टराणी तूं मला बोलण्यांत ऐकणार? असो; आतां चालूं देत नारदपर्वतांचे पोरखेळ आणि चालूं देत तुमच्या करमणुकीच्या लीला! येतों हं मी आतां! (जातो.)

श्रीमा०–आक्कासाहेब, तुम्ही खरंच का महालक्ष्मी आहांत?

श्रीम०–तुम्हाला कसं वाटतं?

श्रीमा०–तुम्ही महालक्ष्मी आहांत, असं मला वाटतं!

श्रीम०–तें कशावरून?

श्रीमा०–बाबा सांगतात म्हणून!

श्रीम०–युवराज, दुर्जन लोक माणसाला पशु बनवितात; पण बाबांच्या सारखे सज्जन पशूलाही देव बनवितात; मग त्यांनीं मला देवी बनविलं, यांत काय आश्चर्य? बाळ, तुम्ही मनांत आणलंत, तर तुम्हांलाही देव नाहीं का बनतां येणार?

श्रीमा०–अक्कासाहेब, तर मग मी आतां देवच बनणार!–

[ पद १३ वें; चालः–चैन नहि आवे०ताल :–त्रिताल. ]

**॥ देव बनुनियां ही काया ॥ तेजयुत पूर्ण करीं मी; वंदिल प्रेमळ कोण न पाया? ॥ गान करिल जन कीर्तीचें जगिं या ॥ध्रु०॥ पाहुनि प्रतिक भुवनिं रमतिल ना? ॥ 'भावपूजनें या माना; विमल सुरगणा' ठरवुनि येतील ॥ प्रेमें भाविक नाशायां माया ॥ १३ ॥**

---

## प्रवेश २ रा.

[ स्थळः–बगीचा; पात्रेंः–महाराणी व सुमति बोलत प्र. क. ]

**महाराणी**–मी साफ सांगतें, श्रीमतीचे हे वेडेचार मी मुळींच चालूं देणार नाहीं!

सुमति०–महाभगवान् विष्णूंना त्यांनीं मनानं वरलं आहे, यांत वेडेचार कसले राणीसाहेब ?

महा०–अग, मनानं वरायला कांहीं हरकत नाहीं, पण ते डोळ्यांना तरी दिसले पाहिजेत ना ? त्यांनीं हिला वरण्याचा रुकार तरी दिला पाहिजे ना ? त्यांचा तर कुठेंच पत्ता नाहीं आणि ही वेडी उगीच नाचते आहे आणि तूं ताल धरते आहेस !–नारदांचं स्थल काय वाईट आहे ग ?

सुम०–मग भगवंतांचं स्थल तरी काय वाईट आहे ?

महा०–पुनः आपलं तेंच ! ती लक्ष्मी तिथें त्यांच्या पायाजवळ खडा पाहारा करते आहे; ती माझ्या पोरीला जवळ तरी येऊं देईल का ? नको ग बाई, सवतीवर माझी मुलगी मुळींच देणं नको ! नारदांसारखा तरुण, प्रथमवर सोडायचा आणि भगवंतांच्या सारखा म्हातारा आजोबा बिजवर जोडायचा, हा कुठला न्याय ? आणि हे श्रीमतीला तरी कसं बरं वाटतं ?

सुम०–प्रेमाचं मीठ सुद्धां खडीसाखरेप्रमाणं मिष्टास लागतं राणीसाहेब ! त्यांचं तर त्यांच्याशीं मनानं लग्न झालं आहे; आतां त्यांना दुसरीकडे देणं, म्हणजे त्यांना, स्पष्टच सांगतें, व्यभिचारिणी बनविण्यासारखं आहे ! हें असलं आहे का आपल्याला पसंत ?

महा०–सुमति !—अगबाई ! पण नारदच इकडे आले ! (नारद प्र. क.) अगबाई ! नारदऋषे ! हें काय ? वीणा उलटी काय म्हणून धरलीत ?

नारद–अरेच्चा ! होय कीं ! श्रीमतीच्या नादांत मन गुंग झाल्यामुळ मी सारे व्यवहार विसरतच चाललों आहे. ही पाहा आतां उलटीची सुलटी करतों !

महा०–पाहा, सुमति, पोरीकरितां जांवई कसे वेडे झाले आहेत ते !

सुम०–तुम्ही आतां संसारी होणार ना ? मग ही वीणा कशाला जवळ बाळगलीत ? चिपळ्या माळांची अडगळ कशाला जवळ ठेवली आहे ? द्या ती फेकून आणि ठेवा नव्या नवरीचे दागिने जमवून !—

[ पद १४ वें; चालः–अति आनंद. तालः–त्रिताल. ]

॥ गुणगौरांगि सुरस सजवा ॥ अलंकार वितरुनिही सुखवा ॥
तरुणि सदनिं जरि हांसविली निशिदिनीं, तरिच लग्नविधि बरवा

**॥ ध्रु० ॥ विलास खुलवा; स्वतांस डुलवा ॥ मधुर भवज मधु घट घट पिउनिही स्वमन स्त्रीसहित रमवा ॥ १४ ॥**

**नार०**—महाराणीसाहेब, तुमच्या मुलीच्या नेत्रकटाक्षांनीं घायाळ झालेला हा वीर तुम्हाला शरण आहे. माझ्यापुढें तर संकटाचा पर्वत येऊन पडलेला आहे!—पण प्रथम सांगा, मी तुम्हाला पूर्णपणें आवडलों आहे ना? मी तुमच्या मनांत भरलों आहे ना?

**सुम०**—इश्श! म्हणजे तुम्ही महाराणीसाहेबांशीं का लग्न लावणार? काय बाई तरी हें! पोरीवर डोळा ठेवतां ठेवतां, पोरीच्या आईवरही डोळा ठेवणारे हे जांवई...

**नार०**—नारायण! नारायण!!

**महा०**—सुमति! काय हा तुझा चावटपणा? जांवई या नात्यानं मनांत भरलों का म्हणून विचारीत आहेत हे!—नारदा, तुम्ही माझ्या मुलीला योग्य वर आहांत; मला तुम्ही मनापासून आवडलांत!

**नार०**—मग तुम्ही वचन दिल्याप्रमाणं काय वाटेल तें करून श्रीमती माझ्या गळ्यांत माळ घालील असं करा. पर्वत—दुष्ट, नीच, वैरी पर्वत मनगटं चावीत परत गेला पाहिजे!

**महा०**—याला काय बरं युक्ति काढावी?—हां असं केलं तर? तुम्ही महाभगवान् विष्णूंकडे चला आणि त्यांना म्हणावं, श्रीमति माळ घेऊन सभेंत आली कीं, पर्वतांचं तोंड—तिलाच तेवढं हं—काळ्या वानरासारखं दिसावं! पर्वत वानर बनले कीं, तिनं तुमच्या गळ्यांत माळ घातलीच म्हणून समजा!

**नार०**—छान युक्ति काढलीत! मी नर आहेच, पर्वताला वानर बनवितों! श्रीविष्णूंच्या कडून घेतों वर. ते माझे आजोबा आहेत. ते नाहीं म्हणणार नाहींत! आतां पाहतों पर्वताचं कसं लग्न होतं तें! सूड! सूड! सूड! (जातो.)

**महा०**—सुमति, आतां श्रीमतीची माळ नारदांच्या कंठांत पडलीच म्हणून समज! (जाते.)

**सुम०**—दोघांपैकीं एक तर वानर बनलाच! राणीसाहेबांनीं पर्वतांना वानर बनविलं काय? आतां मी नारदांना माकड बनवितें! पण या वेळीं

पर्वत भेटायला पाहिजेत! कुठें बरं असतील ते?—अगबाई! शंभर वर्षं आयुष्य आहे यांना! आलेच हे इकडे! ( पर्वत प्र. क. )

**पर्वत**—श्रीमती जयजय! श्रीमती जयजय!

**सुम०**—हें काय पर्वतऋषे? देवाचं भजन करायचं सोडून तुम्ही संसारांतल्या भावी देवीचंच भजन करूं लागलांत!

**पर्व०**—अर्रर्र! असं झालं होय? तुझं चिंतन करतां करतां जिभेवर तुझं नांव नाचूं लागलं आणि त्यानं प्रभुनामाची हाकालपट्टी केली! श्रीमती! प्रेमानं भ्रमिष्ट झालेला हा पर्वत तुला शरण आहे!

**सुम०**—अहो, मी श्रीमती नव्हे, सुमति!

**पर्व०**—अर्रर्र! असं झालं होय? जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणीं मला श्रीमती दिसत असल्या कारणानं तुझ्या ठिकाणींही ती दिसली, यांत नवल काय? सुमति, या नष्ट नारदाचा अडथळा लाथाडून श्रीमति मला माळ घालील का ग? का मी असाच रानोमाळ भटकायचा?

**सुम०**—याला एक युक्ति आहे!—

**पर्व०**—सांग सांग, युक्तिपथदर्शिके, सांग!—

**सुम०**—तुम्हाला वैकुंठीं भगवंतांच्याकडे जातां येईल का?

**पर्व०**—हो, मी नेहमीं तिकडे जातों!

**सुम०**—तर मग असं करा; आत्तांच्या आत्तां या पावलीं, गरुडभरारीनं भगवंतांच्याकडे जा आणि त्यांना म्हणावं, श्रीमती माळ घालायला आली कीं, तिलाच तेवढं हं, नारदांचं तोंड तांबड्या लाल माकडाचं दिसावं! मग सांगा, माकडाच्या गळ्यांत श्रीमती माळ घालील का?

**पर्व०**—भले शाबास! सुमति! भले शाबास!

**सुम०**—मात्र हें नारदांना न कळवितां करा हं; नाहीं तर घोटाळा होईल

**पर्व०**— पाहातों आतां या नीच नारदाचं कसं लग्न होतं तें! सूड सूड सूड! ( जातो. )

**सुम०**—सूड म्हणे सूड! कसला मेल्यांनो, सूड? फटफजितीचा असूड पाठींत बसेल तेव्हां कळेल! दोघेही गुलाम फारच हरकून गेले आहेत;

पण म्हणावं, तुमच्या डोक्यावर तांदळाच्या मंगलाक्षता न पडतां, तुमच्या हातावर मात्र नवरीच्या नांवानं मूठमूठभर वाटाण्याच्या अक्षता पडणार आहेत ! ' चिंती परा तें येई घरां ' हेंच तत्व शेवटीं खरं नाहीं का ?

( जाते. )

मराठी ग्रंथ संग्रहालय

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळः—वैकुंठभुवन; पात्रें:—श्रीविष्णु व श्रीमती. ]

श्रीमतीः—

[ पद १५ वें, चालः--सदयवरा शांत०; ताळः—दादरा. ]

**अडवूं नका ! अमरनायका ! श्रम होय फुका ॥ ध्रु० ॥ थोर कुळीं जन्मुनियां, अनय करितसां हा राया, ॥ शोभत का ? जगिं अपयश होइल, कशि नच ही शंका ॥ १५ ॥**

सोडा माझी वाट ! सोडा ना ! असं काय करता ?

श्रीविष्णु—तुझी वाट त्या गवाक्षाकडे नाहीं; तुझी वाट माझ्या बाहूंत आहे ! ये, इकडे ये, मी तुला तिकडे मुळींच जाऊं देणार नाहीं !

श्रीम०—मला या वैकुंठांत कां आणलीत ?

श्रीवि०—तुझं घर तुला दाखविण्याकरितां ! पाहिलंस का आपलं घर ?

श्रीम०—लग्नसमारंभ झाल्यानंतर शेवटीं यायचंच होतंना मला इथें ?

श्रीवि०—पण आधीं आलं म्हणून बिघडलं कुठें ?

श्रीम०—पण तिकडे माझ्याबद्दल घरीं बोभाटा नाहीं का होणार ? आई तर धाय मोकलून रडेल ! —सर्व म्हणतील , ' श्रीमती घरांतून पळून गेली !'— सोडा मला ! मी त्या पलीकडच्या गवाक्षांतून उडी टाकतें नी अयोध्येंत जातें !

श्रीवि०—इतक्या उंचीवरून तूं खालीं उडी टाकशील, तर तुझ्या शरीराचा चुराडा उडून जाईल !

श्रीम०–हरकत नाहीं ! माझं निर्जीव शरीर तरी अयोध्येंत जाऊन पडूं द्या; पण पळपुटेपणाचा डाग कपाळीं नको !

श्रीवि०–मग माझ्यावर तुझं खरं प्रेम नाहींच म्हणायचं !

श्रीम०–प्रेम आहे, म्हणूनच माहेरीं जाणार !

श्रीवि०—प्रेम आहे, म्हणून माहेरीं जाणार ? वाः ही छान कल्पना !

श्रीम०—काय चुकलें यांत मी ? बापाच्या घरून पळून गेलें, म्हणून माझी अपकीर्ति झाली तरी ती मी सहन करीन, पण मला आपण पळवून नेली, ही आपली अपकीर्ति व्हायला नको जगांत ! आपल्या अपकीर्तीबद्दल मला काळजी वाटत आहे, ती प्रेमावांचूनच का ?

श्रीवि०–लाडके, तूं अगदीं काळजी करूं नकोस. तूं जरी वैकुंठांत आली आहेस, तरी तुझ्या सारखी हुबेहूब दुसरी श्रीमती तुझ्या पित्याच्या घरीं वावरते आहे. त्यामुळं तू पळून गेल्याचा किंवा मी तुला पळवून आणल्याला बोभाटा मुळींच होणार नाहीं ? आतां तरी उरांतली धडकी शांत झाली का ?

श्रीम०–अगबाई ! अशी लीला आपण केली का ? आतां काय ? आपल्या इच्छेप्रमाणं हवी तितकी दिवस मी आपल्याजवळ राहतें, मग झालं ना ? समजलं ना ? कळलं ना ?—पण गडे, त्या कुठें आहेत ?

श्रीवि०—त्या कोण ?

श्रीम०—त्या, नेहमीं आपली चरणसेवा करतात त्या ? समुद्राच्या पोटीं जन्म घेऊन, कमलांत राहून आपलं मन रमवितात त्या ?

श्रीवि०–हं हं, आतां आलं लक्ष्यांत ! एका काळची 'लाडकी लक्ष्मी' होय ?

श्रीम०–होय, त्याच त्याच.

श्रीवि०—आपल्या सवतीची भेट घेण्याची कां इच्छा झाली तुला ? तिला खडसावून कांहीं ताकीद देणार आहेस कीं, काय ?

श्रीम०–इश्श ! या कसल्या भलत्याच कल्पना ? हीच का माझ्या मनाची परीक्षा केली ? सारं सुख एकटीनंच भोगावं, असं मनांत आण-

णारी मी कांहीं एखादी अप्पलपोटी नाहीं!– मला त्यांना गुरु करून घ्यायचं आहे!

श्रीवि०– लक्ष्मीला तूं गुरु करणार? मग माझा संसार चांगलाच सजणार म्हणायचा!

श्रीम०–काय बिघडलं यांत! लक्ष्मी देवींच्या सारखी पतिनिष्ठ स्त्री जगांत तरी दुसरी सांपडेल का? पुरुषांना गुणांची किंमत नाहीं हीच गोष्ट खरी!

श्रीवि०– अग, लक्ष्मीसारखी चंचल या जगांत दुसरी स्त्री नाहीं! ती माझ्या पायाजवळ सारखी बसलेली असते खरी; पण केव्हांच त्रिभुवनांत जाऊन चक्कर मारून येते, ती मला समजत सुद्धां नाहीं! माझ्या हातावर चक्कर पडलं आहे, तर तिच्या पायावर पडलं आहे! बरं कुठें जावं हें तिला कळत नाहीं. सज्जनांच्या, विद्वानांच्या घरीं चुकून सुद्धां पाऊल टाकायची नाहीं; पण दुष्ट दुर्मदांच्या घरीं मात्र पाणी भरील अगदीं! असली स्त्री काय कामाची? बरं जगांत मला कुणीच विचारीत नाहीं; ज्याचा त्याचा माझ्या पत्नीवर डोळा! म्हणून ज्याच्या त्याच्या डोळ्यापुढें नाचणारी माझी लक्ष्मी मी डोळ्याआड केली आणि तुझ्या दृष्टीला दृष्टी भिडीवली!

श्रीम०–मग तर मला मुळींच इथें बरं वाटणार नाहीं! सवतीचा डोळा पाण्यानं भरावा आणि आपण मात्र भरपूर तिच्या डोळ्यासमोर शृंगार साजरा करावा, असं मला कधीं प्राणांतींही वाटणार नाहीं!—दाखवा ना! माझ्याबरोबर प्रेमाची अर्धी वाटणी त्यांना मिळालीच पाहिजे!—सांगा ना कुठें आहेत त्या?

श्रीवि०—माझी लक्ष्मी दाखवूं तुला? चल त्या आरशासमोर! (नेतात.) पाहिलीस? कशी मला मिठी मारून उभी आहे, पाहिलीस?—

[ पद १६ वें; चाल:—मनाला आतां शांतवा०; ताल:—त्रिताल. ]

॥ द्रुमाला कांता वल्लरी, मोहुनी कवटाळी; प्रेम भारी ॥ ध्रु० ॥ दाविसि तेवीं दृढालिंगनें, लीला ललिता मजला न्यारी ॥ १ ॥ खचितचि लाभे सौख्यमूर्ति ही, जरि का दिसली मजला नारी ॥ १६ ॥

श्रीम०—इश्शं! हें काय हें? लक्ष्मी म्हणून आरशांत माझंच प्रतिबिंब दाखविलंत मला! एखाद्याची थट्टा करायला कशी छान येते अगदीं!

श्रीवि०—यांत थट्टा कसली? 'लक्ष्मी दाखीव' म्हणालीस, लक्ष्मी—गृह-लक्ष्मी—खरी 'लाडकी लक्ष्मी' दाखविली तुला!—श्रीमती, तूंच लक्ष्मी आहेस!—तूंच लक्ष्मीचा अवतार आहेस! मग तुला तुझं प्रतिबिंब दाखवूं नको, तर काय दाखवूं?

श्रीम०—अगबाई! मीच का लक्ष्मी? काय बाई नवल तरी! म्हणे मीच लक्ष्मी. पण मग मला अशी दूर कां केलीं? माझा कंटाळा आला होय!

श्रीवि०—अंबरीष राजानं मागील जन्मीं लक्ष्मी कन्या असावी, या उद्देशानं तप केलं होतं, म्हणून या जन्मीं तूं त्याची कन्या झालीस!

श्रीम०—हें काय बरं असं मला आपल्यापासून दूर करून ज्याच्या त्याच्या पदरांत टाकायचं तें?

श्रीवि०—आणि तूंच एखाद्याच्या घरांत पाय मोडून पडतेस ती! तुझा खरा नारायण इकडे वैकुंठांत, तुझ्या विरहांत माशा मारीत बसलेला असतो आणि तुझ्यामुळं बनलेला नवकोट नारायण तिकडे मजा मारीत असतो, तेव्हां कसं?

श्रीम०—हें आपल्या इच्छेवांचून होतं का! आपण तेवढे संतांच्या घरीं रावतां आणि मला मात्र दुर्जनांच्या घरीं जायला सांगतां! नाहींच मी बोलत आपल्याशीं! पुरुष तेवढे अप्पलपोटे!—पाहूं सुद्धां नका माझ्याकडे! स्वतःला पाहिजेत सज्जन आणि माझ्या दैवीं मात्र दुर्जन!

श्रीवि०—अरेरे! हें अस्त्र माझ्यावरच उलटेल अशी माझी कल्पना नव्हती! श्रीमती, याबद्दल मला क्षमा कर! हें पाहा,—

श्रीम०—कांहीं पाहात नाहीं मी. आत्तांपर्यंत पुष्कळ पाहात आलें आहे!

श्रीवि०—या अपराधाबद्दल मला शासन कर! राजा भयंकर अपराध्याला शिरच्छेदाचं शासन देऊन त्याचं अंग रक्तानं रंगवितो; तूं माझी राणी केशरी रंगानं माझं अंग रंगीव! पिचकारीनं माझ्या अंगावर रंगाचा मारा करून मला जर्जर कर!

श्रीम०—हा हा, या खेळाला छान रंग भरेल; पण आपणही उलट माझ्यावर मारा केला पाहिजे!

श्रीवि०—पण यांत तूं मला शासन केलंस असं होणार नाहीं!

श्रीम०—या खेळांत आपणही उलट सामना दिला नाहीं, तर मी हातांत पिचकारीही धरणार नाहीं! अशी बसून राहीन! ( बसते. )

श्रीवि०—आपल्या अंगावर रंगसेचन करतों, पण उठावं महाराणीसाहेब! उठावं, ही पिचकारी अशी हातांत धरावी महाराणीसाहेब! ( उठवितात. )

श्रीम०—मी सरळ उभी राहाणार नाहीं हं आपल्यासमोर; अशी इकडे तिकडे धावून चुकवीन; तश्शांत आपण रंग खेळला पाहिजे!

श्रीवि०—हो हो, कबूल कबूल! आपण वाटेल तिकडे धांवा! ( खेळतात व मधेंच थांबतात. )

श्रीम०—कां थांबलांत? दमलांत होय?

श्रीवि०—केशरी रंगानं तूं भिजून चिंब झालीस! तुझे हाल पाहून तुझी मला दया येते!

श्रीम०—छे हो, हा खेळ मला अतिशय आवडतो! ( श्रीविष्णु गुप्त होतात. ) हं, भ्यालातना मला शेवटीं? आतां आपल्याला कुठें शोधूं? कुठें आहांत आपण? कुठेंही डोळ्याला दिसला नाहींत, तरी माझ्या हृदयांत आहांत ना? करूं का जर्जर आपल्याला रंगानं? ( पडद्यांत— “ नारायण नारायण! ” ) अगबाई! पर्वतऋषि आले आणि त्यांनीं मला ओळखलं तर? आतां कसं करूं? ( हळूच ) यायचं म्हटलं. पर्वतऋषि आले आहेत. यायचं हो लवकर! यायचं!—आतां जाऊं तरी कुठें मी? तिकडचीं दारं बंद; इकडून तर पर्वत येताहेत! लपून तरी बसतें इथें! ( आसनाखालीं बसते; पर्वत येतात. )

पर्वत—नारायण नारायण! (स्व.) अरे, इथें तर कुणीच नाहीं आणि भगवंत कुठें गेले आहेत? येतील आतां. तोंपर्यंत थोडी विश्रांति घेत बसावं ( बसणार तोंच आसन हालतें. ) आं? हा काय चमत्कार? या आसनांत कसा प्राण संचारला? ही भुताटकी तरी नव्हे? आणि ती प्रत्यक्ष वैकुंठांत?

म्हणजे देवांचं राज्य संपलं कीं, काय ?–(उघड) भगवंत ! अहो भगवंत ! ( ते येतात. ) नमस्ते भगवन् ! नमस्ते भगवन् !

श्रीवि०—साधुसत्पुरुषांच्या चरणीं माझं नम्रपूर्वक वंदन असो !

पर्व०—अहो, एक क्षणापूर्वीं हें आसन अपोआप हालत होतं ! आपणच कांहीं चमत्कार केला होता कीं, काय ?

श्रीवि०—छे: बुवा ! काय म्हणतां आसन हालत होतं ? ( जवळ जाऊन श्रीमतीला बाहेर आणतात. ) हा पाहिला का प्राणी ? याच्यामुळंच आसनांत जीव संचारला होता !

श्रीम०–( हाळूच ) हें काय हें ? मला ओळखतील ना ते ?

श्रीवि०--तूं भिऊं नकोस; तुला ते लक्ष्मीच समजतील !

पर्व०–तरी म्हटलं, आसन कसं हालत होतं ? आईसाहेब ! काय करीत होतां आसनाखालीं ? ढेकूण मारीत होतां कीं, काय ?

श्रीवि०--छेहो, वैकुंठांत कुठले ढेकूण ?

पर्व०--काय नियम ? एकादशीदिवशीं जर एखाद्यानं मृत्युलोकीं आपल्या बिछान्यांतले ढेकूण मारले असले, तर पुण्य दिवशीं मृत्यु आल्यामुळं त्यांचा थवाच्या थवा वैकुंठीं यायचा !

श्रीवि०--आम्ही रंग खेळत होतों, इतक्यांत तुम्ही आलांत, तों ही लाजून इथं लपली झालं !

पर्व०—आईसाहेब ! आम्हाला लाजायला नको. आम्ही तुम्हाला पोरंच आहोंत !

श्रीवि०–पर्वतमुने, आपण उभे काय राहिलां ? बसा ना आसनावर. आपण चालून चालून थकला असाल ! आपले पाय······

पर्व०–छे छे, इथून मला आतां लवकर पाय काढलाच पाहिजे ! घाईचं तशी आहे ! लग्नघाईच म्हणानांत ! देवा, माझं लग्न ठरलं कीं !

श्रीवि०---काय ? आपलं लग्न ठरलं ? फार उत्तम गोष्ट झाली ! बरं वधू कुठली ?

पर्व०--अंबरीषराजाची कन्या श्रीमती ! फाकडी आहे कीं, नाहीं बायको ? ऐसा लग्नाचा कडाका उडवून देतों कीं, यंव !

श्रीम०-पण तो नारद मधें आडवा आला आहे म्हणे !

पर्व०--म्हणजे! आईसाहेब! तुमच्यापर्यंत ही वार्ता आली का?--खरंच, देवा, श्रीमतीचं स्वयंवर होणार असून जो आवडेल, त्याच्याँ गळ्यांत ती माळ घालणार आहे. त्याकरितां, देवा, तुम्ही एवढं कार्य केलं-पाहिजे!--श्रीमती माळ घालायला आली कीं, तिलाच तेवढं नारदाचं तोंड माकडासारखं लाल दिसावं!--दुसरं माकडच म्हणानांत!

श्रीवि०--अशानं काय होईल?

पर्व०--काय होईल? नारदाला नवरी न मिळाल्यामुळं तो संतापानं चिपळ्या कुटीत जाईल आणि तिचा बाप तो अंबरीष--क्षणभर मीच अंब-रीष म्हणानांत; आईसाहेब, तुम्ही म्हणे श्रीमती; आणि देवा, तुम्ही म्हणे नियोजित वर; तो हा हात असा तुमच्या--म्हणजे माझ्या हं--माझ्या हातांत देईल! ( देतो. ) शुभमंगल सावधान! शुभमंगल सावधान!!

श्रीम०--इश्श! पर्वतऋष! माझं एकदा लग्न झालं आहे आणि हें पुनः कसलं करतां?

पर्व०--हा आपला प्रत्यक्ष वस्तुपाठ दिला तुम्हा दोघांना! बाकी आईचीं लग्न मुलांनीं लावण्याचे दिवस पुढें येणार आहेत म्हणा!--हो, खरं, देवा, माझी एवढी कामगिरी आपण केली पाहिजे!

श्रीवि०--हो हो, अवश्य करतों! भक्तांची इच्छा पूर्ण करायची नाहीं, तर करायची कुणाची? तुम्ही अगदीं काळजी करूं नका. श्रीमति वर-माला घेऊन आली कीं, तिला नारद माकड दिसेल!

पर्व०--देवा, हे माझ्यावर आपले उपकार आहेत. नारद आपला नातु असूनही आपण माझं म्हणणं मान्य केलंत, यांत आपलं भक्तवात्सल्य दिसून येतं. येतों आतां. आईसाहेब, आतां मला श्रीमती कशी मिळत नाहीं पाहातों? येतों. नमस्कार. ( जातो. )

श्रीवि०--अरेरे! केवढ्या योग्यतेचा माणूस, पण पाहिलंस, मोहांत साप-डल्यामुळं किती कवडी किंमतीचा झाला आहे तो!--

[ पद १७ वें; चालः--जय जय जगदीश०; तालः--दादरा. ]

॥ त्यजि निज पद; जाण, जाय शरण जो विकारा ॥ ध्रु० ॥ शैलशृंग उदारें जरा ॥ देइ जला ठाव, धरा ॥ तारें निरखित; होय चुरा ॥ तुडवी जन सारा ॥ १७ ॥

मी कांहीं तरी करून याची फजिती उडविणारच होतों; पण परस्पर हें माझं काम तुझी आई आणि तुझी मैत्रीण सुमति या दोघींनीं केलं, हें छान झालं!

श्रीम०—तें सारं खरं, पण रंगविलास अर्धाच राहिला!

श्रीवि०—अजुनीं आहे वाटतं खेळायचं मनांत?

श्रीम०—रंगविलास कुणाला आवडत नाहीं? सूर्यनारायण तर रोज उदय-काळीं पूर्व दिशेच्या अंगावर सोनेरी पिचकारींतून केशरी रंगाचं सेचन करतो ना? प्रदीप्त झालेला अग्निनारायण आपल्या प्रिय ज्वालेला नारंगी रंगवितो ना?

श्रीवि०—मग हाही नारायण आपल्या प्रियतमेच्या गालावर लालरंग उधळतो ना?

श्रीम०—मग वल्लभाच्या प्रीतीनं प्रियकरणीचं निर्मळ हृदयही रंगतं ना?

श्रीवि०—पण रंगविलास करायला माझी कुठें ना आहे?

श्रीम०—होय ना? चला तर खेळूं लागा पुनः रंग! मरा खेळांत पुनः रंगत!

[ पद १८ वें; चालः—गातें गुणकला०; तालः -केरवा. ]

**॥ अशी, उभि असे ॥ चला या, खेळाया, रमा या ॥ रंगवा मला रविकांता जशी ॥ ध्रु० ॥ नाजुक नारी, तरि मी हारीं ॥ जाय कधीं ना ॥ जाणा भ्रमवी प्रेमला, ही दिननिशीं ॥ १८ ॥**

( गुप्त होते. )

श्रीवि०—हं, मी मघाशीं गुप्त झालों, त्याचा हा वचपा काढलास वाटतं? पण तूं कुठें दडशील? शोधून काढून तुला रंगानं नाहायला घालीन, तरच नांवचा......( नारद मागून प्र. क. )

नार०—नारायण! नारायण!

श्रीवि०—हं हं, अशी मागं आलीस का? ही पाहा, भिजविली तुला! ( नारदाच्या अंगावर एकदम रंग टाकतात ) अरेरे! हें काय? नारदा, तुम्ही केव्हां आलां? छे छे छे! केवढा घोटाळा झाला हा! च् च् काय झालं हें? नारदा, तुम्ही विनाकारण गेला कीं हो रंगून!

नार०–शुभ शकून! शुभ शकून! देवा, हा शुभ शकून झाला!–माझ्या अंगावर रंग पडला! आतां माझं लग्न खचित् होणार! निर्जीव लग्नपत्रिकेवर केशराचा शिडकाव झाला, तर एवढा लग्नाचा धूमधडाका उडतो आणि आतां तर काय, प्रत्यक्ष माझ्याच–नवऱ्या मुलाच्या अंगावर रंग पडला! आतां हा लग्नसमारंभ पार पडलाच म्हणून समजा!

श्रीवि०—काय, नारदा, तुमचं लग्न ठरलं?

नार०–ठरलं म्हणून काय विचारतां? झालंच म्हणून समजा!

श्रीम०–पण नवरी तरी कुठली नेमस्त केली आहे?

नार०–अंबरीष राजाची मुलगी श्रीमती! मुलगी अशी मोहक आहे कीं, काय सांगू? मी पसंत केली आहे; पण तुम्ही एकदा पाहातां का? तुम्ही आमच्या आजीबाई. वडील मंडळीच्या डोळ्यांखालून वधू जावी हें उत्तम!

श्रीवि०–लग्न करायचं आहे तुम्हाला. तुम्ही पसंत केली आहेत ना? झालं तर. आम्ही निराळं पहायला नको.

नार०–पण काय करूं देवा? हा आडवा आला आहे हो!

श्रीवि०–कोण आडवा आला आहे?

श्रीम०–अंतरपाट असेल! तेवढाही विरह तुम्हाला सहन होत नाहीं ना?

नार०–अंतरपाट नव्हे हो, हा बहिर्पाटच आडवा आला आहे! एका काळचा माझा जीव कीं प्राण, मित्र पर्वत आडवा आला आहे! देवा, एखाद्याच्या लग्नांत विघ्न करणं शोभतं का त्याला?

श्रीवि०–छेः लग्नांत विघ्न कधींही करूं नये. लग्नांत विघ्न केलं कीं, स्वतःचं त्याचंच लग्न होत नाहीं म्हणतात!

नार०–बरं, खुशाल शांतपणानं तपश्चर्या करायची सोडून लग्नाची उठाठेव करायला त्याला कुणी सांगितली आहे कोण जाणे? तुम्हीच पहा, देवा, त्याचा केवढा अधःपात होणार आहे तो!

श्रीवि०–बरं, या साऱ्या गोष्टी त्याला समजत असनसुद्धां पुनः तो तसं वागतो, म्हणजे हा त्याचा शुद्ध गाढवपणा नव्हे का?

श्रीम०–हो, खरंच एवढा तपस्वी आणि लग्नाच्या भानगडींत पडतो म्हणजे काय? निवळ मूर्खपणाच हा!

**नार०**—आतां त्याला तुम्हीच तसं म्हणतां, म्हणून बरं आहे; मी म्हटलं असतं, म्हणजे जगानं एवढे डोळे केले असते! तेव्हां त्या नीचाची खोड मोडावी अशी कांहीं तरी युक्ति काढा!

**श्रीवि०**—हें आहे तरी काय प्रकरण?

**नार०**—हें प्रकरण असं आहे. ( कानांत सांगतो. )

**श्रीवि०**—असं असं? श्रीमती माळ घालायला आली कीं, पर्वतऋषींचं तोंड वानरासारखं काळं कुस्स दिसावं, अशी व्यवस्था करायची ना? ठीक ठीक?

**नार०**—तो पर्वत हांसला कीं, काळ्या ढगांत वीज चमकल्यासारखं दिसून श्रीमती दचकून मागं सरली पाहिजे!—का आजीबाई, आहे कीं, नाहीं छान युक्ति? याला म्हणतात डोकं! पर्वत वानर झला कीं, श्रीमतीनं माझ्या गळ्यांत—

**श्रीम०**—'माळ घातलीच म्हणून समजा' असंच ना? पण तुम्ही चट-कन मान पुढें करा; नाहींतर रानोमाळ पळत सुटाल!

**नार०**—अहो, तिच्याकरितां तर एवढी धांवपळ आणि माळेच्या ऐन वेळेला मी पळेन कसा? बरं आहे. देवा, मी निर्धास्तपणें जाऊं ना?

**श्रीवि०**—अगदीं खुश्शाल! पर्वत काळ्या तोंडाचा वानर होईल! चला, खुश्शाल चला आणि श्रीमतीला हक्कानं उचला!

**नार०**—येतों आजीबाई! येतों आजोबा! ब्रम्हदेवबाबा अक्षतीला येती-लच, पण मीही आपलं आमंत्रण देऊन ठेवतोंः नातवाच्या लग्नाला आल्या-शिवाय राहायचं नाहीं बरं का! येतों!

**श्रीवि०**—या! ( नारद जातो. ) मत्सरानं आणि मदनानं मारलेल्या या दोन महात्म्यावर माकडचेष्टा करण्याचा प्रसंग यावा ना! पण या गुलामांची अशी फजिती उडालीच पाहिजे! श्रीमती, हे राजवाड्यांत पाऊल टाकतात न टाकतात तोंच केवळ तुलाच नव्हे, तर सर्वांनाच वानरमर्कट भासतील, अशी मी घटना घडवून आणतों. त्याशिवाय यांची खरी मजा होणार नाहीं!—

[ पद १९ वें; चालः—द्रेना द्रेन्ना०; तालः—एक ताल. ]

॥ वंद्य काज टाकी आज; मम जन भवास भुलला ॥ ध्रु० ॥ स्नेहास मुकला; मलिन भारी झाला ॥ जपातपा स्मरशरें विसरला॥ १९॥

चल, आतां तुला अयोध्येंत पोंचवितों! ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

[ स्थळः—राजवाडा; पात्रें:—महाराणी व सुमती. ]

**महाराणीः**—कशी पण आपल्याला छान युक्ति सुचली! तस्सं त्यांनीं केलं असेल! आतां यांची मात्र सभेंत खूप फजिती उडणार!

**सुमतिः**—उडालीच पाहिजे त्यांची फजिती! इकडे कळ लाव तिकडे कळ लाव; इकडे भांडण पेटीव तिकडे भांडण पेटीव; असा सारखा त्यांचा उद्योग चाललेला असतो! अति शहाण्याचा बैल रिकामा! अशी त्यांची गंमत होणार आहे कीं, काय सांगूं? जगांत कुणी शहाणपणाचा गर्व करूं नये.

**महा०**—हे कसले ग बाई मित्र? वैरी हे! आपल्या मित्राचं चांगलं लग्न होत आहे, तर आनंदून त्याला मदत करायची कीं, सूड उगविण्याच्या बुद्धीनं आपली त्याच्या बायकोवरच नजर ठेवायची! पण त्यांची अशी मौज होणार आहे!

**सुम०**—नुसती मौजच का? चांगली खोडच मोडणार आहे!

[ पद २० वें; रागः—शंकरा; तालः—त्रिताल. ]

॥ भाव असा मनिं कां धरिला? ॥ नेइल यांना जो दुर्गतिला ॥ ध्रु० ॥ मान महा मिळवियला ॥ परि तो गेला अजि विलयाला ॥ २० ॥

चांगली वीणा वाजवीत, भजन करीत हिंडायचं सोडून, हे लांडे कारभार कुणी सांगितले आहेत यांना? लग्नच नशीबांत असतं, तर ब्रह्मदेवांनीं ते यापूर्वीच केलं असतं!

**महा०**—म्हणजे? तूं कुणाबद्दल बोलते आहेस?

**सुम०**—आपण कुणाबद्दल बोलत आहांत?

**महा०**—मी पर्वतांच्याबद्दल बोलतें आहे!

**सुम०**—मी नारदांच्याबद्दल बोलतें आहे!

**महा०**—काय? जांवईबुवांची निंदा माझ्या तोंडावर करते आहेस? सुमति, आपली पायरी सोडून असं वागणं चांगलं नव्हे सांगतें! ते साधु सत्पुरुष त्यांची निंदा करून दुर्गतीचं साधन करते आहेस, हें चांगलं का?—

[ **पद २१ वें; चालः**—बजन लगे०; **तालः**—त्रिताल. ]

**॥ बनत रसना मलिना ॥ कटु वच वदतांना ॥ ध्रु० ॥ सुजन प्रभु सतत मानिं तनुधर; शरण म्हणुनि जा वंद्य पदांना ॥ २१ ॥**

**सुम०**—पर्वतही तसेच साधुसत्पुरुष नाहींत का?

**महा०**—कळलं शहाणपण तुझं! एकवार तुला क्षमा केली आहे. पुनः मात्र जांवईबुवांची अशी निंदा करीत जाऊं नकोस!—बरं श्रीमतीनं शृंगार बरोबर केला आहे ना? डोक्यांत कांहीं वेड घेऊन रडत नाहींना बसली? ( श्रीमान प्र. क. )

**श्रीमा०**—त्या पाहा आक्कासाहेब! पाहा त्यांचा शृंगार! आईसाहेब, कोपऱ्यांत जाऊन रडत बसायला आमच्या आक्कासाहेब कांहीं रडतराऊत नाहींत! त्या पाहा, कशा हांसत तुमच्याकडे येत आहेत!

[ **पद २२ वें; चालः**—प्रिय झाला०; **तालः**—केरवा. ]

**॥ नवबाला, शशीकला नभाला, जशी सुशोभे सदनाला ॥ ध्रु० ॥ रत्नें सोज्वळ तारामंडळ ॥ कारितें झळझळ तेजें ॥ ये कशी ठुमकत अशी मुरडत, करि मधुस्मित, तम तुडवित, मन रमवित, जन खुलवित ही कमला ॥ २२ ॥**

( श्रीमती प्र. क. )

**महा०**—छान, बाळे, मुखावर नेहमीं अशींच उत्साहाचीं फुलं उधळावीं! एकंदरींत आज स्वयंवर छानच होणार तर!—बाळे, मला आपल्या मनांतलं सांगना, तूं दोघांपैकीं कुणाला वरणार आहेस!

**श्रीमा०**—मी सांगूं कुणाला वरणार आहेत या तें?

**महा०**—सांग पाहूं.

**श्रीमा०**—दोघांपैकीं कुणाला तरी एकाला वरणार आहेत या!

**श्रीम०**—किंवा दोघांपैकीं कुणालाही वरणार नाहीं मी!

**महा०**—छे छे, असं होईल? सभेंत वचन दिलं आहेस तूं, कुणाला तरी वरलंच पाहिजे तुला!

**सुम०**—पण ताईसाहेबांनीं काय वचन दिलं आहे, इकडे लक्ष्य नाहीं वाटतं आपलं? त्या काय म्हणाल्या होत्या? दोघांपैकीं जो आवडेल त्याच्या गळ्यांत माळ घालीन; पण यांना दोघांपैकीं कुणीच आवडला नाहीं तर?

**महा०**—बाळे, मी हात जोडतें, अशी पळवाट काढून तूं अनर्थ करूं नकोस! मला, तुझ्या आईला एवढी भिक्षा घालतेस का? पर्वतांना—जांवईबुवांच्या त्या काळतोंड्या वैऱ्याला तूं वरीत नाहींस हें ठरलेलंच आहे; ते तुला वानरच दिसणार; पण नारदांना मात्र नाकारूं नकोस! त्यांच्या गळयात माळ घालून मला दाखीव एकदा जांवईबुवांचं आनंदी तोंड! जोडा कसा लक्ष्मी—नारायणासारखा दिसेल!

**श्रीम०**—आई, तूं मला भलताच आग्रह कां करतेस?

**महा०**—मी तुझे पाय धरूं का? आपल्या जननीकरितां नाहीं का तूं एवढं करणार? मी तुझे पाय धरतें, स्वयंवराचे धिंडवडे करूं नकोस तूं!

**श्रीम०**—आई, तूं माझी जन्मदात्री. तुझ्याकरितां मी एवढी साधी गोष्टही करणार नाहीं का? स्वयंवर मंडपांत नारद आले, तर त्यांच्या गळ्यांत मी माळ घालीन हं आई! काळजी करूं नकोस तूं!

**महा०**—किती गुणाचीग बाई माझी बाळ ती! बाळे, लिंबलोण उतरून टाकूं का तुझ्यावरून? आतां जातें आणि ही आनंदाची बातमी तिकडच्या कानावर घालतें! तिकडे सांगतें नारदच जांवई होणार! (जाते.)

**श्रीम०**—भोळी बिचारी आई! सुमति, मी नारदांना वरणार या कल्पनेनं किती ग हरखून गेली आहे ही!

**सुम०**—तुम्ही खरंच का राणीसाहेबांना वचन दिल्याप्रमाणं नारदांच्या गळ्यांत माळ घालणार आहांत?

**श्रीम०**—छे ग, असं कधीं झालं आहे का? मी आईला काय वचन दिलं आहे? स्वयंवर मंडपांत नारद आले, तर त्यांच्या गळ्यांत माळ

घालीन; पण मंडपांत नारद न येतां मुळीं लाल तोंडाचं माकडच येणार आहे! ( कानांत ) असा प्रकार झाला आहे!

**सुम०**—अगबाई! असं का? मग एकूण हीं वानरमर्कटं तुम्हांलाच केवळ न दिसतां साऱ्या सभेलाही दिसणार म्हणायचीं! तर मग आज खूपच गंमत उडणार, सांगून ठेवतें!

**श्रीमा०**—मी तर त्यांना पाहून अशा किंकाळ्या फोडतों कीं, त्यामुळं सर्वांचीच धांदल उडावी! त्यांना वेडावून दाखवून गंमत गंमत करतों!

**श्रीम०**—( कानांत ) शिवाय असंही आज होणार आहे!

**सुम०**—आमचं भाग्य म्हणूनच, ताईसाहेब, आपल्या सारख्या महादेवींचा आम्हांला सहवास घडला!

**श्रीम०**—आईला मात्र यांत थोडसं फसवितें आहे. पण शेवटीं तिला आनंदच होणार आहे. यांची स्वारी तिला दिसत नाहीं, म्हणूनच काय तो तिचा नारदांच्याकडे ओढा; नाहीं तर आई कांहीं तशी माझ्याविरुद्ध नाहीं हो! यांनीं आईला दर्शन दिलं असतं, म्हणजे सर्व कांहीं सुरळीत झालं असतं; पण इकडे सांगावं कुणी बाई? ( महाराणी प्र. क. )

**महा०**—श्रीमती, सुमति, चला. स्वयंवराची सारी तयारी झाली! तो पहा नृत्यांगनांचा नाचसुद्धां सुरू झाला! चला चला बरं लवकर!

**श्रीमा०**—चला, आतां खूपच मौज उडणार, चला! ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

[ **स्थळः**—राजसभा; **पात्रें:**—अंबरीष, सभाजन, नृत्य चाललें आहे. ]

**अंब०**—( नृत्य आटोपल्यावर ) प्रिय प्रजाजन हो! आजपर्यंतच्या परंपरेला अनुसरून व क्षात्रधर्माला योग्य असं मी माझ्या प्रिय कन्येचं आज स्वयंवर मांडलं आहे. नारद आणि पर्वत हे दोन महात्मे इच्छुक वर म्हणून या सभेंत येणार आहेत. माझी कन्या या दोघांपैकीं ज्यांच्या कंठांत माळ...( पडद्यांत—पळा पळा! धांवा धांवा! हुप हुप! इ० गलबला ) एकाएकीं हा गलबला कसला झाला? कुठें दंगा मारामारी

तरी नाहींना झाली? किंवा राजधानीवर शत्रु तरी चाल करून आले नाहींत ना? ( पुनः दंगा ) कोण आहे रे! सेनापतींना आज्ञा द्या! सैन्याची तावडतोब जुळवाजुळव करा! ( द्वारपाल प्र. क. ) काय रे! बाहेर दंगा कसला उसळला आहे? शत्रूंनीं राजवाड्यावर...

**द्वारपाल**–नाहीं, महाराज, तसा कांहीं भयंकर प्रकार नाहीं, पण शरीरानं नारद पर्वत ऋषीसारखे दिसणारे, पण तोंडाकडे पाहिलं, तर वानर-मर्कटांप्रमाणं भासणारे असे दोन विचित्र प्राणी राजवाड्याच्या द्वारावर आले आहेत आणि त्यांना पाहायला जमलेल्या आबालवृद्धांचा हा गलबला आहे! (पाहून) अरे बापरे! हे पाहा, अडथळ्याला न जुमानतां आलेच हे विचित्र प्राणी! (नारद पर्वत व लोक प्र. क )

**नार०**–राजा! हीच का तुझ्या नगरांतील पौरजनांची सभ्यता?

**पर्व०**–तुझी राजधानी म्हणजे बदमाष गुंडांची...

**श्रीमा०**–बाबा! आलीं, हीं माकडं अंगावर आलीं! ( लोक दंगा क. )

**अंब०**–शांत राहा, सारे एकदम शांत राहा! हें काय प्रकरण आहे, याची प्रथम मला चौकशी करूं द्या!—महाराज, आपण कोण आहांत?

**नार०**–माझ्याबरोबर आलेलं हें काळ्या तोंडाचं वानर असेल; पण मला—नारदाला कसं ओळखलं नाहींस, राजा?

**पर्व०**-मी पर्वत नाहीं का? राजा, या गाजरमुखी माकडाला कशाला सभेंत येऊं दिलंस? ही सभा म्हणजे कांहीं पशुसंग्रहालय नव्हे! दे याला हाकलून!

**अंब०**—पौरजन हो, ही नारदपर्वतांचीच जोडी आहे, यांत संशय नाहीं. विवाहाच्या वेळीं नवरामुलगा नट्टापट्टा, थाटमाट करतो; पण यांनीं जो आज थाट केला आहे, तो मानव जातीला नवा आहे, यांत शंका नाहीं!

**श्रीमा०**–बाबासाहेब, अहो, कुठले हे नारदपर्वत? असले वेष ते कधीं घेतील का? मला वाटलं,-हीनपुच्छ वानरमर्कटांच्या जातीपैकीं हे कळपांतून पळून आलेले प्राणी असावेत! यांच्या गळयाला साखळी बांधून यांना आपल्या बागेंत ठेवून टाकूं!—बाबासाहेब! ते पाहा, कसे वेडावून दाखवीत आहेत ते! ( महाराणी प्र. क. )

महा०—पर्वत वानरमुखी झाले, ते एक ठीक झालं; पण नारदा, तुम्हाला कुणी हो माकड बनविलं? नारदा, तुमचं मुख कसं चंद्रासारखं झळकत होतं, तें आतां उंदरासारखं कस हो दिसूं लागलं?

नार०—काय म्हणतां? माझं मुख माकडासारखं दिसूं लागलं आहे?

पर्व०—काय? माझं मुख वानरासारखं दिसतं आहे?

श्रीमा०—तुमच्या काळ्या तोंडाकडे पाहिलं कीं, डोळ्यापुढें अंधारी येते! हें काळं तोंड घेऊन कशाला आलांत, मुनिमहाराज, या सभेंत?

महा०—आणि माझे जांवई असे कसे ग बाई भाजलेल्या तोंडाचे झाले? नारदा! आतां आपल्या गळयांत कशी हो श्रीमती माळ घालील?

पर्व०—तुम्ही सर्वांनीं कट करून मला वानर बनविण्याचा डाव रचलेला दिसतो; पण मी अशानं फसणारा नाहीं!

अंब०—पर्वतमुने, आपला स्वर, ढब, ऐट बरोबर आपलीच दिसते; पण हें तोंड कुठें करपून घेऊन आलांत?

नार०—ए काळतोंड्या! कशाला रे इथें आलास? जा, एखाद्या मोठ्याशा झाडावर जाऊन, पाला चघळीत 'हुप हुप' करीत बैस जा!

पर्व०—आणि तूं तरी इथें कशाला आला आहेस रे तांबडतोंड्या? मानवांच्या समुदायांत माकडाचं काय काम? जा, तूंही झाडावर उड्या मारीत माकडचेष्टा करीत बैस जा!

नार०—मंडळी हो, माझंही तोंड माकडासारखं लाल दिसतं आहे?

श्रीमा०—माकडासारखं काय? माकडच दिसतां तुम्ही!

नार०—बस्स! तुम्ही सर्वांनीं एकमतानं मला माकड बनवून हाकलून देण्याचं ठरविलेलं दिसतं; पण मी अशानं फसणारा नाहीं! आणा श्रीमतीला; श्रीमतीचं स्वयंवर झालंच पाहिजे!

अंब०—पण आपलीं हीं तोंडं······

नार०—एक शब्दही ऐकणार नाहीं! श्रीमतीला आण प्रथम!

पर्व०—राजा, विचार कसला करतोस? बस! श्रीमती!

श्रीमा०—श्रीमती माणसाशीं विवाह करील!

दोघे—मग आम्ही कोण आहोंत?

श्रीमा०--तुम्ही पशु आहांत!

दोघे--काय म्हटलंस? आम्ही पशु? अरे पोरट्या! (श्रीमान ओरडतो.)

अंब०--पोरीचं लग्न होईपर्यंत आणखी काय काय धिंडवडे होणार आहेत ते एक परमेश्वरालाच माहीत!—महाराज, रागावूं नका. कोण आहे रे? श्रीमतीच्या हातांत रत्नमाला देऊन तिला आणा. महाराज, तोंपर्यंत आपण बसावं या आसनावर. ( दोघे बसतात; श्रीमती सुमतीसह खालीं मान घालून प्र. क. )

नार०--श्रीमती, माझ्या गळ्यांत माळ घाल. तूं पूर्ण सुखी होशील. या हुप्याला वरशील, तर मात्र तुझ्या जन्माचे धिंडवडे होतील!

पर्व०--श्रीमती, तुझ्या कल्याणाची एकच गोष्ट सांगतों, तो हार माझ्या गळ्यांत घाल. पाहा, या नारदाच्या तोंडाकडे पाहा आणि मग त्याला पसंत करायचं असेल तर कर!

सुम०—अग बाईग! ताईसाहेब, पाहिलंत का? हे किती भेसूर दिसत आहेत तें! असल्यांच्या गळ्यांत का तुम्ही माळ घालणार?

श्रीम०—म्हणजे? (पहाते.) अग बाईग! बाबा! हीं भयंकर माकडं या सभेंत कशाला आणलींत? शेवटीं पशूशीं माझं स्वयंवर होणार का? देवा देवा! काय हे माझे धिंडवडे!

नार०--राजा, आरसा आण पाहूं. खरंच मी माकड झालों आहे कीं, काय?

अंब०--कोण आहे रे! आरसा आणा. ( आरसा नारदांच्या हातीं देतात. )

नार०--( आरशांत पाहातो. ) अरे बाप रे! काय हें माझं माकडाचं भयंकर तोंड! कुणी मला माकड बनविलं?

श्रीम०—तुमच्या कर्मानं--तुमच्या पापी इच्छेनं तुम्ही देवांचे पशु बनलांत!

पर्व०--नारदा, तूं माकड बनलेला मला दिसत आहेसच; पण पाहूं आरसा! माझं तोंड मला पाहूं दे. ( पाहातो. ) अरे बापरे! धांवा! कुणीतरी धांवा आणि या भयंकर प्राण्यांपासून मला सोडवा!--या नारदाचंच

हें सारं कपट दिसत आहे! दुष्टा! पहिल्यांदा जिवाला जीव देणारा जिवलग मित्र होतास, तो एका सुंदर स्त्रीच्या पायांत प्राणांतिक फजीती करणारा वैरी बनलास!

**नार०**—तूंही तेंच केलंस! मला माकड कुणी बनविलं? त्रैलोक्याला आपल्या पायावर नमविणाऱ्या या देवकोटींतल्या नारदाला जनावर कुणी बनविलं? हारामखोरा! तुझ्यावांचून कोण हें नीच कार्य करणार? जगांत कलागती लावून मौज पाहाणाऱ्या या सुरमुनींची फजिती कुणी केली? तूंच! तूंच! तूंच! श्रीमतीशीं लग्न करून मी सुखाचा संसार थाटला असता, तर तुझं काय बिघडल होतं? जगांत काय दुसऱ्या कुमारिका लग्न करायला नव्हत्या काय?

**पर्व०**—मीही तुला तेंच विचारतों. 'करावं तसं भरावं' हा जगाचा न्यायच आहे! माझ्याकरितां तूं खळगा खोदलास, त्यांत मी तर पडलोंच; पण माझ्याबरोबर तूंही पडलास! आतां जगाच्या अंतापर्यंत मी तडफडत पडणार आणि माझ्याबरोबर तूंही पडणार! श्रीमती, दुर्दैवानं दोघेही पशु झालों आहोंत; पण आमची बुद्धि आणि आमचा अधिकार हा कांहीं नाहींसा झाला नाहीं. बोल, तेव्हां तूं कुणाच्या गळयांत माळ घालणार?

**श्रीम०**—मी कुणाच्याच गळयांत माळ घालीत नाहीं!

**नार०**—आपल्या पित्यासमोर वचन दिल्याप्रमाणं तुला कुणाच्या तरी गळयांत माळ घातलीच पाहिजे! हें स्वयंवर तुला नाकारतां येणार नाहीं!

**श्रीम०**—मी माझ्या बाबांना नारद आणि पर्वत या दोघांपैकीं जे आवडतील, त्यांच्या गळयांत माळ घालण्याचं वचन दिलं आहे!

**नार०**—मग हा मी तुझ्यापुढें नारद उभा आहे, घाल माळ!

**श्रीम०**—तुम्ही नारद नाहीं; तुम्ही माकड आहांत!

**पर्व०**—हा पर्वत तुझ्यापुढें उभा आहे!

**श्रीम०**—तुम्ही वानर आहांत; तुम्ही पर्वत मुळींच नाहीं! आई नारदांनाच वरीन असं तुला गुप्त वचन दिलं होतं; तूंच सांग, या माकडाच्या गळयांत आतां मी माळ घालूं का?

**महा०**—छे ग बाई असं मी कधीं तरी सांगेन का? देवा, कायरे केलंस हें? असं झालं तरी कसं?

**श्रीम०**— सभाजन हो, या सभेंत नारदपर्वतांपैकीं कुणाला तरी वरीन असं मी बाबांना वचन दिलं होतं; पण यावेळीं इथें नारदपर्वतांऐवजीं वानरमर्कटं आल्यामुळं त्यांना मला वरतां येणं शक्य नाहीं. कारण असल्या पशूनांसुद्धां वरीन, असं मी मुळींच वचन दिलं नव्हतं! अर्थात् मी बाबांच्या वचनांतून मुक्त होत आहे आणि बाबाही देवर्षिब्रह्मर्षि नारदपर्वतांच्या वचनांतून--ते इथें उपस्थित न राहिल्यामुळं--मुक्त होत आहेत!

**सुम०**—पिसाट बनलेल्या पशूंनों, आणि मोकाट बनलेल्या माकडांनों! चला, तुम्ही या सभेंतून अरण्यांत चालते व्हा! अंबरीष महाराज खरे साधुसत्पुरुष आहेत. त्यांच्या चांगुलपणाचा अधिक लाभ घेण्याची इच्छा कराल, तर चिडलेल्या या सभाजनांच्या दंडुक्यांनीं सडकून निघाल!

**श्रीमान**--चला, महाराज, चला एकदा. झाली इतकी फजिती पुरी झाली नाहीं का? यापेक्षां आणखी शोभा करून घेणार आहांत?

**अंब०**—नका, दुर्दैवानं विकाराला बळी पडलेल्या, दुर्वासनेनं प्रत्यक्ष पशू बनलेल्या, पापाचारानं तेजोहीन झालेल्या आणि कुकर्मानं फटफजीती पावलेल्या या महात्म्यांचा असा अपमान करूं नका! ध्यानांत ठेवा, सूर्य तो सूर्य! तो धुक्यानं दडविला, तो मेघांनीं व्यापला, तो राहूकेतूंनीं ग्रासला, तरी सूर्य तो सूर्य! तो केव्हांही आपल्या तेजानं चमकणारच! महाराज, आपला अधःपात झाला आहे. आतां आत्मसंशोधन करून आत्मविकास करा आणि पुनः पहिल्या तेजानं चमकूं लागा. विकारांना बळी पडलेला माणूस पशुवृत्तीचा—नव्हे, तर प्रत्यक्ष पशु—बनतो, हें आज आपण स्वतःच्या उदाहरणानं जगाला दाखविलंत हा जगावर आपला उपकारच झाला आहे!

**नार०**--राजा, तूं आपलं वचन पुरं केलंच पाहिजेस!

**पर्व०**--नाहींतर आम्ही दोघे तुला शापून भस्म करूं!

**सुम०**--त्या गोष्टी विसरा आतां! 'बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो पडेल काय!' तपस्वीमहाराज, तुमच्या असल्या अरेरावीनं तुमच्या तेजाचे कोळसे झाले आहेत. त्यावर शापाचा कितीही फुंकर घातलांत, तरी त्यांतून एक ठिणगीही बाहेर पडणार नाहीं!

**नार**०--हे पाहा, या पोरीचा हात धरून असा तिला ओढीत घेऊन जातों! पाहूं हिला कोण सोडवितो तो! ( राजा आडवा येतो. )

**अंब**०--दुसरा कोणी असता, तर त्याचा हात तुटून पडला असता! पण मी तुमच्यावर शस्त्र उचलीत नाहीं! हा माझा निश्शस्त्रप्रतिकार आहे!

**पर्व**०--चल, बाजूला हो! मध्यें येऊन विनाकारण कां मरतोस?

**श्रीमा**०--आक्काच्या अंगाला हात तरी लावा, या तरवारीनं त्याचे तुकडे तुकडेच होतील, लक्ष्यांत ठेवा!

**नार**०--चल, बाजूला हो रे पोरट्या! ( ढकलतो. )

**सुम**०--कुठें निघालांत? तुम्ही कोण तपस्वी आहांत कीं, दरवडेखोर आहांत?

**पर्व**०--मध्यें कशाला आलीस अवदसे?

**श्रीम**०--अडवूं नका, त्यांना कोणींही अडवूं नका! येऊंदेत, खुशाल इथें येऊन माझ्या--आपल्या मातेच्या अंगावर हात टाकूं देत! माझ्या अंगाला स्पर्श करतांच या पतिव्रतेचं तेज काय आहे, याचा यांना अनुभव येईल! यांचे डोळे खाडकन् उघडतील! यांचे हात लुले पडतील! या, पशूंनो! या! हे हात पुढें केले आहेत; करा धमक असेल तर पाणिग्रहण!

**नार**०--बस्स! ही स्त्री मला पाहिजे! पर्वता, हिच्या अंगाला हात लावशील, तर तुझी मान मुरगाळून टाकीन!

**पर्व**०--तूंही खूप समजून ऐस; माझ्या पत्नीला हात तरी लाव, तुझंही प्रेत पाडीन! ( दोघे झोंबी करतात; श्रीमतीला धरतात; तोंच दिव्य प्रकाश पडून श्रीविष्णु प्रगट होतात; श्रीमती त्यांच्या गळयांत माळ घालते; सर्व वंदन करतात; श्रीविष्णु श्रीमतीसह गुप्त होतात. )

ला. ना. सं. ७८९
११-११-३३

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला

( स्थळः- अरण्य; पात्रेः-नारद व पर्वत प्र. क. )

पर्वत-कोण तो ? नारदच का ?

नारद-होय. तूं कोण पर्वतच का ?

पर्व०- होय. तोच मी मूर्ख पर्वत ! मित्रा !—

नार०-काय प्रियमित्रा ?—

पर्व०-तुझ्याशीं वैर करण्यांत माझ्या हातून केवढी चूक झाली ?

नार०-' माझ्या हातून ' असं कां म्हणतोस ? ' आपल्या हातून ' असं म्हण; कारण तुझ्याशीं वैर करण्यांत माझाही महामूर्खपणा झाला आहे !

पर्व०-खरोखर मैत्रीसारखी मौज नाहीं !

नार०-आणि वैरासारखं विष नाहीं ! एकदा अंगांत भिनलं कीं, डोकं बेफाम बनलंच ! यापूर्वी एकमेकांच्या करितां रक्ताचं पाणी आणि हाडाचीं काडं करणारे आम्ही दोघे एकमेकांचे हाडवैरी बनलों !—

[ पद २३ वें; राग-मिश्र; तालः-त्रिताल. ]

॥ किती यातना ॥ नाना ॥ ध्रु० ॥ लय परि झाला, खर असुखाचा; ॥ करूं आतां मधु पाना ॥ २३ ॥

पर्व०—फुलासारखं नाजुक आणि सुवासिक असणारं आमचं हृदय सूडाच्या इच्छेनं त्रिशूलासारखं कठोर झालं !

नार०-आम्ही दोघे एक होतों, तेव्हां आमच्या वाणींत तेज होतं, दंडांत पराक्रम होता आणि वागण्यांत रुबाब होता !

पर्व०—पण दोघांत वैराग्नि धुमसतांच आमचं तेज विझलं, पराक्रम पळाला आणि वागण्यांतला तोल गेला ! गुडघ्याएवढ्या पोरट्या सोरट्यांनींही आमचा कवडीकिंमतीनं बाजार भरविला !

नार०—आपआपसांतली फाटाफूट म्हणजे अशीच आहे. दोघांचं

भांडण झालं कीं, तिसऱ्याचा लाभ झालाच. दोघांची मारामारी म्हणजे तिसऱ्याची श्रीखंडपुरी!

**पर्व**—मित्रामित्रांची, भावाभावांची जुंपली कीं, तिसऱ्याची पोळी पिकलीच! श्रीमतीकरितां आम्ही आपआपसांत झगडलों, पण आमच्या कपाळीं बडवली फजिती आणि तिसऱ्याच्या हातांत पडली श्रीमती!

**नार०**—मित्र मित्र राहिलों असतों, तर एकाचं तरी लग्न झालं असतं; पण एकमेकांच्या भांडणांत दोघेही श्रीमतीला मुकलों आणि पशुवृत्तीला विकलों!

**पर्व०**—हें सारं एका स्त्रीच्या पायांत झालं. स्त्रीच्या मोहानं परमेश्वराचे पशु बनलों! स्त्रीजात परमार्थाला मारक आहे, हा जो आमचा मूळ सिद्धांत, तो आमच्याच शोचनीय दृष्टांतानं दृढ झाला!

**नार०**—कांहीं वेळ आम्ही श्रीमतीच्या मोहानं एकमेकांच्या नरडीचा घोट घेणारे सुंदोपसुंदच झालों होतों. सुदैव आमचं कीं, आम्ही एकमेकांशीं शस्त्र घेऊन लढलों नाहीं!

**पर्व०**—तसं झालं असतं तर एका अर्थी मरून मुक्त तरी झालों असतों; पण आतां फजितीनं निर्माण केलेलं जितं मरण—ही पिशाचावस्था आपल्याला कशी सहन होणार? जिथें जिथें जाऊं, तिथें 'हेच ते बायकोकरितां एकमेकांच्या मानगुटीवर बसणारे महात्मे' म्हणून आमच्याकडे लोक बोट दाखविणार!

**नार०**—'गुलाम करायला निघाले लग्न; पण ज्यांना संसारांतली युवती मिळवितां येत नाहीं, ते परमार्थातली मुक्ति कशी मिळविणार?' म्हणून लोक आमच्याकडे पाहून फिदीफिदी हासणार! तरी त्यांतल्या त्यांत बरं कीं, आमचीं पूर्वीचीं तोंडं आम्हांला परत मिळालीं!

**पर्व०**—त्यापेक्षां वानरमर्कटांचींच तोंडं कायम राहून, आम्हांला आणखी वर शेपटं फुटलीं असतीं, तर फार बरं झालं असतं! आम्ही मुकाट्यानं आपलीं तोंडं काळीं करून पशूंच्या कळपांत मिसळलों असतों आणि जगाला हें तोंड न दाखवितां, आयुष्याच्या अंतापर्यंत अरण्यांत दडलों असतों. पण आतां हें तोंड घेऊन कुठें जायचं?

**नार०**—मित्रा आतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे!—पण त्यांनीं मात्र असं करायला नको होतं!

**पर्व०**—त्यांनीं कुणी? देवांनीं ना? खरोखर हा देवांचा—नको, अधिक बोलून जीभ विटाळीत नाहीं! त्यांनीं आमच्या भांडणाचा फायदा घेऊन आमच्या हातावर दिल्या तुरी आणि आपण उपटली नवी नवरी! हें देवांनीं चागलं केलं नाहीं! जाऊं द्या झालं!

**नार०**—जाऊंद्या काय? दोघे एक होऊन एकमुखानं त्यांना याचा जाब विचारूंया! देवच असला स्वार्थ साधूं लागले, तर देवांत आणि दग-लबाज दैत्यांत फरक तो काय राहिला? पाहातों ती श्रीमती देवांना कशी पचते ती!

**पर्व०**—ठीक आहे. उभयतांनीं एक होऊन, आपआपसांतलीं भांडणं मिटवून, त्यांच्यावर हल्ला केल्यावर त्यांची फेफे उडेल नुसती! चल, मित्रा, चल, आतांच वैकुंठीं जाऊं. आमचा संसार उध्वस्त झाला, त्यांचाही उध-ळून टाकूं, चल! ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळः**—वैकुंठ; **पात्रेंः**–श्रीविष्णु व श्रीमती. ]

**श्रीविष्णुः**—श्रीमती, आज तूं माझ्या पट्टराणीपदावर पुनः अधिष्ठित झालीस; प्रियभक्त अंबरीषाची इच्छा पूर्ण झाली; आणि माझी 'लाडकी लक्ष्मी' मला पुनः अखंड लाभली!

[ **पद २४; चालः**–छूंछननन; **तालः**– अद्धा त्रिताल. ]

**॥ हा दिनभर, हा सुखकर क्षण आला ॥ कांताप्रेमें आत्मा नितांत मोदें बहरला ॥ ध्रु० ॥ जाण घोर तो समय सपला ॥ विरह जिवाला मुळीं नच उरला ॥ २४ ॥**

**श्रीमती**–माया ही अशी आहे; वास्तविक मी लक्ष्मी असतांनाही अयोध्येंतल्या माहेराबद्दल मला हुरहुर लागून राहिली आहे. त्या सर्व प्रिय मंडळींची सारखी आठवण होते आहे. माझी एवढीच इच्छा आहे कीं, माझं हें वैभव त्यांनीं मनमुराद पाहावं आणि—

**श्रीविष्णु**—काय? लाडके, आणि काय?—

**श्रीम०**—आपल्या त्रैलोक्यसुंदर जामातांना डोळा भरून—

**श्रीवि०**—'डोळा भरून पाहावं' असंच ना? म्हणजे मलाही असं वाटत नसेल, अशी का तुझी कल्पना आहे? त्या सर्व प्रिय मंडळींना आणविण्याकरितां मी नुकतंच विमान पाठविलं आहे. सर्व मंडळी पळा दोन पळांत—पळा दोन पळांत कशाला? ही पाहा, आलीच सर्व प्रिय मंडळी! ( अंबरीष, महाराणी, श्रीमान व सुमति प्र. क. ) यावं, प्रियजनहो, यावं! आपणा सर्वांचं सुस्वागत असो!

**अंबरीष**—श्रीप्रभूंच्या पायीं भक्तिपूर्वक वंदन असो! भगवन्, आज अनेक जन्मींची इच्छा पूर्ण झाली, साक्षात् आदिमाया कन्या झाली आणि तिनंच आपल्या पायाची प्राप्ति करून दिली!

**श्रीम०**—बाबा, मी यांत अधिक काय केलं? आपली भक्तीच इतकी गाढ आहे कीं, प्रत्यक्ष परमेश्वरानंही आपली सेवा करावी!

**महा०**—साक्षात् वैकुंठाधिपति मला जावई मिळाले; केवढी मी भाग्याची! नाहीं तर मी वेडीनं नारदांच्याकरितां खटपट चालविली होती!

**सुम०**—ताईसाहेब, आपल्या मनासारखी एकदा गोष्ट झाली ना?

**श्रीम०**—सुमति, तूं मला मनापासून मदत केलीस, याची मी उतराई कशी होऊं? मनानं वरलेला तुझा प्रियकर तुला मिळून तुम्ही दोघांनीं अखंड सुख भोगावं, अशी मी प्रभूंच्या पायाजवळ प्रार्थना करीत आहे!—

[ पद २५ वें; राग भैरवीमालकंस; तालः—त्रिताल. ]

**॥ नमुं या पाया राया, निर्मलभावें विनवूंया ॥ काय कृपाळा ये न दया? ॥ ध्रु० ॥ प्रेमरसाचा देव भुकेला ॥ दूर करोनी निजकांतेला ॥ भक्तभाव का पूर्ण न केला? ॥ साधुसंतजन प्राण जया ॥ २५ ॥**

**श्रीवि०**—तथास्तु! सुमति, तथास्तु! तुझ्या मित्रप्रेमाला जगांत तोड मिळणार नाहीं!—युवराज!—

**श्रीमान्**—भगवन्, आक्कासाहेब मला वरचेवर दिसणार नाहींत, म्हणून अतिशय वाईट वाटत आहे. आक्कासाहेबांना पाहावसं वाटतांच आपण त्यांना वैकुंठांतून अयोध्येंत पाठवाल ना?

**श्रीवि०**—हो, अगदीं अवश्य वरं बाळ?

**श्रीमान्**—नुसत्या आक्कासाहेबांनाच पाठवूं नका; आपणही त्यांच्या-बरोबर या!–पण आपले आणखी दोन हात काय झाले?

**श्रीवि०**—माझे दोन हात भक्तावर वरदहस्त ठेवण्याकरितां गुंततात, तर दुसरे दोन शत्रूंना हात दाखवीत असतात! या वेळीं इथें माझी प्रेमळ मंडळीच असल्यामुळं तुमच्या प्रमाणं मानवस्वरूपांत मी दोन हातांनीं वावरतों आहे बाळ! (पडद्यांत—जबाब द्या! जबाब द्या!)

**अंब०**—संतापानं कर्कश झालेला हा कुणाचा बरं स्वर?

**श्रीवि०**—माझे प्रिय भक्त नारद आणि पर्वत आलेले दिसतात!

**श्रीम०**—अगबाई ग! संतापाच्या भरांत आतां ते काय करतील कोण जाणे! (पडद्यांत—जबाब पाहिजे! तुमच्या दुष्कृत्याचा जबाब पाहिजे!)

**श्रीवि०**—माझं दुष्कृत्य? माझं दुष्कृत्य कीं, या मार्ग चुकून भरकट-लेल्या भक्तांचं दुष्कृत्य, तें आतां सर्व जगाला दिसेल! या वेळीं यांचे सर्व अपशब्द गिळून या भक्तांचा आत्मविकास मला घडवून आणायचा आहे! –या, प्रियभक्तांनो, या. तुमचं स्वागत असो! (नारद व पर्वत प्र. क.) श्रीमती!–नव्हे, लक्ष्मी! यांच्या पूजनाची तयारी कर! बसा, सज्जन हो, या आसनावर बसा!

**नार०**–लग्नप्रकरणाचा निकाल झाल्याशिवाय आम्ही आपली पूजा स्वीकारणार नाहीं!

**पर्व०**–इतकंच नव्हे, तर आमच्या प्रश्नाचं योग्य उत्तर मिळाल्याशिवाय आम्ही इथें बसणारही नाहीं!

**श्रीवि०**–पूर्वीं प्रेमानं एकमेकांच्या गळ्यांत गळा घालणारे तुम्ही आपलं मन क्षुद्र करून एकमेकांचा गळा कापायला सिद्ध झाला होता; पण लवकरच शुद्धीवर येऊन, मला जाब विचारण्याच्या निमित्तानं का होईना, पण पुनः तुम्ही एक झालांत, एकमेकांचे स्नेही बनलांत, यांत मला आनंद आहे! तुमची ही एकी अशीच अखंड राहो!

**नार०**–बस् करा हीं मानभावाचीं बोलणीं!

**पर्व०**–'भक्त भक्त' म्हणायचं, भक्तांना सपशेल निजवायचं आणि आपलं घर सजवायचं, हा कुठला न्याय?

श्रीवि०–पण काय झालं, तें तरी सांगाल कीं, नाहीं?

नार०–माझं तोंड माकडाचं कसं झालं?

श्रीवि०–तें या आपल्या प्रिय मित्रांनीं बनविलं!

पर्व०–आणि माझं तरी वानराचं कसं झालं?

श्रीवि०—तें या आपल्या प्रिय मित्रांनीं बनविलं!–भक्तांनो, तुम्ही प्रगट केलेली इच्छा पूर्ण करणं माझं कर्तव्य आहे; त्याप्रमाणं मी केलं, यांत माझा काय अपराध?

नार०–तुमचा काय अपराध असणार? आमचं भांडण पेटवून त्यावर आपल्या लग्नाच्या पोळ्या भाजणारे तुम्ही साळसूद, तुमचा काय अपराध असणार?

पर्व०—आम्हांला फसवून तुम्ही ही श्रीमती उपटलीत, पण खूप समजून राहा, या स्त्रीच्या पायांत आम्ही आमच्या अधिकारांपासून भ्रष्ट झालों आणि असे देशोधडीला लागलों; तुमचीही अशीच अवस्था होईल! स्त्री ही परमार्थाला केव्हांही मारक आहे.

श्रीवि०—मन इतकं क्षुद्र करूं नका. थोर करा. आत्मसंकोच केव्हांही वाईट. उच्चपदावर जायचं असेल, तर आत्मविकास करा. पुरुषांना जर स्त्रिया मारक असतील, तर स्त्रियांनाही पुरुष मारक आहेत, हीही गोष्ट तितकीच खरी आहे! वास्तविक कुणीकुणालाच मारक नाहीं; या जगांत तारक मारक असेल तर स्वतःचं मनच आहे! स्वःच्या दुबळेपणाच्या दोषाचं खापर स्त्रीजातीच्या डोक्यावर फोडणं, म्हणजे स्त्रीजातीचा हा अक्षम्य अपराध आहे!

नार०—हें तत्वज्ञान ऐकायला आम्ही आलों नाहीं!

पर्व०—आमची पत्नी तुम्ही कां उपटलीत, याचं प्रथम उत्तर पाहिजे!

श्रीवि०—ठीक आहे. देतों याचं उत्तर. हा वादविवाद ऐकायला महाराज अंबरीष, महाराणी आणि युवराज यांच्यासह इथें उपस्थित आहेत, हें एक ठीकच आहे म्हणायचं!–महाराज आजच्या विवादसभेचं अध्यक्षस्थान मी आपणाला देत आहे!

अंब०—छे छे! आपण जगद्गुरु, मला इतका मान—

श्रीवि०—नाहीं, हा मान आपण स्वीकारावा! –प्रथम तुम्ही लक्ष्यांत ठेवा, तुमच्या कल्याणाकरितां मी हें तुमचं लग्न मोडलं!

नार०—आमच्या कल्याणाकरितां? भले महाराज! चांगलं कल्याण झालं आमचं!

श्रीवि०—या श्रीमतीला पाहाण्यापूर्वी तुम्ही एकमेकांच्या प्रेमामृतांत पोहणारे थोर महात्मे होतां!—

पर्व०—मग आतां कुठं नाहीं?

श्रीवि०—पण तिला पाहातांच तुम्हीं मोहांत सापडलांत आणि एकमेकांचे वैरी बनलांत! अशा रीतीनं दोन पायऱ्या घसरून खालीं आलांत! पाहा, स्वतःला तपासून पाहा!

नार०—बरं, पुढं!

श्रीवि०—तपश्चर्येचं हेंच ध्येय कीं, स्वतःशिवाय कुणावरही सत्ता गाजवायची नाहीं, दडपशाही करायची नाहीं, बळ लादायचं नाहीं, पण आपली वासना तृप्त करण्याकरितां तुम्ही राजावर आणि श्रीमतीवर जबरदस्तीचा अत्याचार करूं लागलांत आणि आणखी एक पायरी घसरून खालीं आलांत!

पर्व०—बरं बरं! श्रीमतीला तुम्ही कां वरलंत, याचा खुलासा करा!

श्रीवि०—तुमचं हें लग्न कामवासनेच्या क्षुद्र पायावर उभं होतं. कामवासना हा आर्यांचा लग्नाचा मुख्य हेतु नाहीं. राष्ट्राच्या स्वाधीन प्रबळ, तेजस्वी संतान करून पितृऋण फेडतां यावं, आणि गृहस्थाश्रमांत राहून तीन्ही आश्रमांची सेवा करतां यावी, याकरितां आर्य लग्न करीत असतात. पण तुम्ही क्षुद्र बनून कामवासनेला बळी पडलांत आणि आणखी एक पायरी घसरलांत!

नार०—पर्वत एक कामवासनेला बळी पडला असेल, पण मी सुद्धां?

श्रीवि०—हो, दोघेही कामवासनेला बळी पडलांत! बरं इतकी फजिती झाली, तरी तुमचे डोळे उघडले नाहींत; तुमचा संसार मोडला, तसा माझाही मोडण्याच्या दुष्ट इच्छेनं तुम्ही इथें आलांत, हें तुमच्यासारख्या थोरांना शोभतं काय?

पर्व०—हें आमच्यासारख्यांना शोभत नसेल, पण आमची वायको

मधल्यामध्यें लाटणं, हें तुमच्यासारख्यांना तरी शोभतं काय ?

श्रीवि०–याचाही उलगडा करतों; सज्जनहो इतकंही असलं तरी ही माझी पत्नी तुम्हा दोघांनाही अर्पण करायला तयार आहे. जिथें मी माझ्या भक्तांना माझी पदवी देतों तिथें पत्नी द्यायला कधीं मागं पाहीन काय?— श्रीमती, चल, तुझा हात या दोघांच्या हातांत देतों. माझ्या भक्तांच्या लाडक्या इच्छेपुढें मला माझ्या लाडक्या लक्ष्मीचीही पर्वा नाहीं!–चला, नारदपर्वतांनो! करा हात पुढें!—कां? विचार कसला करतां?

श्रीम०–सज्जनहो! तुम्ही कुणाशीं विवाह करीत आहांत याचा विचार केलांत का? यांची पट्टराणी जी 'लाडकी लक्ष्मी' तीच मी श्रीमती! नारदा, मी तुमची नात्यानं आजी आहे आणि पर्वता, तुम्ही मला आई म्हटलेलंच आहे. इतकं असूनही आपली इच्छा असेल, तर आपल्याशीं लग्न करायला मी एका पायावर सिद्ध आहे!

श्रीमा०–करा, महाराज, करा आपल्या आईशीं आणि आजीशीं लग्न! होऊं दे एक जगांत नवीन धडा! हं, करा जिवाचा धडा!

श्रीवि०–भक्तांनो, या पुढें. मी स्वतः लग्न लावायला सिद्ध आहे. माझी पट्टराणी–माझी 'लाडकी लक्ष्मी' माझ्याकडे आणली म्हणून मी दोषी कीं, आपल्या आई आजीशीं लग्न लावूं पाहाणारे तुम्ही दोषी, याचा विचार करा!

**नार०**–मग रंगक्रीडेदिवशीं आपल्याबरोबर—

श्रीवि०–श्रीमतीच होती ती पण तुम्हांला लक्ष्मी वाटली!—मग आहे का लग्नाचा विचार?

**पर्व०**—देवा, आमचे डोळे आतां उघडले! आमचे दोष आम्हांला ढळढळीत दिसूं लागले! आम्हीं सर्वांची क्षमा मागतों!

**नार०**—यापुढें आतां मी लग्नाच्या फंदांत कधींही पडणार नाहीं! माझं मन मी क्षुद्र करणार नाहीं! आमच्या अपराधाची आम्हांला क्षमा करा!

श्रीवि०—भक्तांनो, क्षमा कसली मागतां? तुम्ही शुद्धीवर आलांत, यांतच मला आनंद आहे. आम्हीही वरून संसारी दिसत असलों, तरी अंतरीं विरक्तच आहोंत. तुम्हांला एकच सांगणं, मन क्षुद्र करूं नका, थोर करा! आत्मविकास करा. आत्मविकास हाच तुम्हाला तारक होईल?

पर्व०—आत्मविकास, देवा, या पुढें आम्ही—

नार०—आत्मविकास करणार!

श्रीवि०—भक्तहो, तुम्ही थोरच आहांत. केवळ तुमच्या चित्तचंद्रावर विकारांचे ढग आले होते, इतकंच काय तें. आतां तुम्ही पूर्ण कलेनं झळकूं लागलांत. आजचा आनंद अनंत आहे. मित्रहो, आतां मी तुमचं आणखी काय प्रिय करूं सांगा?—सांगा,-अंबरीष महाराज! तुम्ही सांगा!—

अंब०—देवा, आपलं दर्शन घडलं, यांतच आम्हांला सर्व कांहीं मिळालं आहे; तरी पण देणं असेल, तर हेंच द्यावं —

[ पद २६ वें; चाल—भवदा वरदा० तालः—त्रिताल. ]

॥ विमल असावी वासना ॥ पाहुनि दीना उपजो करुणा ॥ ध्रु० ॥ तव यश आम्ही संतत गावें ॥ त्रिभुवनसुंदर रूप पहावें ॥ ब्रम्हानंदीं सदा डुलावें ॥ आस मनीं ही असे पावना! ॥ २६ ॥

समाप्त

देशबन्धु संगीत मण्डळीच्या रंगभूमीवर
पूर्ण यशस्वी झालेली
श्री. गणेश कृष्णशास्त्री फाटककृत नवी नाटिका.
सुन्दर छपाई ) व्याही-विहिणी ( सुरम्य वाङ्मय
विक्रीस तयार. १ प्रतीकरितां ४॥ आ. पो. ति. पा.
पत्ता:-स्वर्गसाम्राज्यपुस्तकालय-कुरुंदवाड ( स्टेट. ).
याशिवाय-मुंबई, सांगली, मिरज, रत्नागिरी, कोल्हापूर,
मडगांव, नागपुर, बेळगांव इ. ठिकाणींही मिळेल.

दुसरी आवृत्ति विक्रीस तयार!!
सचित्र छपाई ] माझी जमीन [ किं. १ रु. ट. ह. नि
अखिल महाराष्ट्रांत गाजलेल्या व श्री. फाटकशास्त्री यांच्या
यशस्वी लेखणींतून उतरलेल्या या नाटकाबद्दल
अधिक प्रशंसा कशाला करावयास पाहिजे ?
देशबन्धु संगीत मण्डळीचें
हातखण्डा नाटक!
पत्ता:-स्वर्गसाम्राज्यपुस्तकालय-कुरुंदवाड [ स्टेट ].
याशिवाय:-मुंबई, सांगली, मिरज, रत्नागिरी, कोल्हापूर,
नागपूर, मडगांव, सोलापूर, बेळगांव इ. ठिकाणींही मिळेल

देशबंधु संगीत मंडळीच्या रंगभूमीवर

हास्यरसाचा तुफान दर्या

म्हणून गाजलेलें, श्री. फाटकशास्त्रीकृत, नवें नाटक

# नानांची माया

विक्रीस तयार किं. ८१२ ट. ह. निराळा.

सुंदर चित्रें, सुबक छपाई.

पत्ता:- स्वर्गसाम्राज्यपुस्तकालय कुरुंदवाड ( स्टेट ).

याशिवाय—मुंबई, सांगली, मिरज, रत्नागिरी, कोल्हापूर मडगांव, नागपूर, सोलापूर, बेळगांव इ. ठिकाणींही मिळेल

श्री. फाटकशास्त्रीकृत सर्वत्र गाजलेलें

# क्रान्तिकौशल्य

फक्त ५।१० च प्रती शिल्लक.

किं. २ रु. ट. ह. निराळें.

पत्ता:- स्वर्गसाम्राज्यपुस्तकालय कुरुंदवाड [ स्टेट ].

याशिवाय—वरील प्रमाणें इतर गांवींही मिळेल.

## बालनटांची आनन्द संगीत मण्डळी
## आपल्या बादशाही रंगभूमीवर

संगीत ) **स्वर्ग–साम्राज्य** ( सचित्र

हें श्री. फाटकशास्त्रीकृत राजकीय पौराणिक नाटक करीत असते.

अँटिक पेपरवरील सुंदर छपाई; किं. ८१२ ट. ह. निराळें

**पत्ता**:—स्वर्गसाम्राज्यपुस्तकालय कुरुंदवाड [ स्टेट ].

याशिवाय मुंबई, सांगली, मिरज, रत्नागिरी, कोल्हापूर मडगांव, नागपूर, बेळगांव इ. ठिकाणींही मिळेल.

## श्री. फाटकशास्त्रीकृत नवें हृदयस्पर्शी नाटक

किंमत ८१२ ] **स्वर्ग-सुन्दरी** [ शिवाय ट. ह.

**रंगदेवता रघुवीर सावकार यांच्या रंगभूमीवर विजयी झालेलें हें पौराणिक सचित्र संगीत नाटक.**

**विक्रीस तयार !**

**पत्ता**:—स्वर्गसाम्राज्यपुस्तकालय–कुरुंदवाड [ स्टेट. ]

याशिवाय मुंबई, सांगली, मिरज, रत्नागिरी, कोल्हापूर नागपूर, सोलापुर, बेळगांव इ. ठिकाणींही मिळेल.

सणावारीं, आनंदाच्या शुभप्रसंगीं आणि
मित्रमंडळींना मेजवानी देण्याच्या वेळीं

**आमची आठवण ठेवा !**

कृष्णाकांठच्या मिष्ट व लज्जतदार

# खव्याचे

# सातारी पेढे

मिळण्याचें खात्रीलायक ठिकाण:--

तुळजाराम मोदी, मोतीचौक–सातारा.

पत्ता टिपून ठेवा.

*शिवाय आमच्याकडे*

*इतर मिठाईही मिळते.*

एकवार ऑर्डर देऊन खात्री करून घ्या.

॥ श्री ॥

**पौष्टिक पाकांचा राजा!** **एक वेळ घेऊन तर पाहा!!**

राजेरजवाडे, जहागीरदार वगैरे मोठमोठ्या लोकांकडून सर्टिफिकिटें मिळालेला कुरुंदवाड येथील प्रसिद्ध पाकशास्त्रज्ञ

## डी. के. मुळे यांचा

# हनुमान कूष्मांड पाक

( ट्रेडमार्क–हनुमान )

या अमृततुल्य पाकाच्या सेवनानें मुलें सफरचंदासारखीं गुटगुटीत होतात; तरुण तगडे जवान बनतात; व म्हातारे तारुण्याच्या सुखसागरांत पोहूं लागतात. सर्व उष्णतेचे मूत्रविकार नाहींसे होतात; बुद्धि तल्लख बनते; शरीरांत शक्ति व अंतःकरणांत उत्साह खेळूं लागतो; एकंदरींत ओज व तेज चमकूं लागतें. चेहऱ्यावरील अवकळा व सुरकुत्या नाहींशा होऊन तो गुलाबाच्या फुलाप्रमाणें सुंदर दिसूं लागतो. गर्भपतन होणें वगैरे स्त्रियांचेही विकार याच्या सेवनानें नाहींसे होतात.

या पाकांत सालंमिश्री, सफेतमिश्री, बदाम, पिस्ते, आक्रोड, केशर, गुळवेलसत्व, बेदाणा, तालीमखाना, भुईकोहळा वगैरे अत्यत पौष्टिक असे ७२ जिन्नस महत्प्रयासानें मिळवून घातले आहेत. सकाळीं २ ताळ्यांची १ वडी व संध्याकाळीं जेवणानंतर २ तोळ्यांची १ वडी खाऊन वर गाईचें किंवा म्हशीचें पावशेर दूध प्यावें. ३ आठवड्यांत पूर्ण गुण येईल. २० दिवस पुरणाऱ्या १ डब्याची किंमत ४॥ रु एकदम ३ डबे घेतल्यास १२ रुपये. ट. ख. निराळा.

**सूचनाः**—आमच्याकडे उत्तम, मसालेदार केशरी पेढे, पित्तनाशक कवठाची वर्फी व आल्याचा गुलकंद मिळेल. दरावद्दल लिहा.

मिळण्याचा पत्ताः—

**डी. के. मुळे**; पाक एक्सपर्ट्स,

कूष्मांडपाक ऑफीस, कुरुंदवाड ( स्टेट. )


ESTD. IN 1882.
SHET K. L. & SON,
JEWELLERS,
KARWAR, N. KANARA.

जन्मसन व तारीख यांवरून एक वर्षाचें स्पष्ट
भविष्य सांगणारें

# नित्योपयोगी वर्षफल

( दरवर्षी तयार होतें; चालू वर्षाचें तयार आहे )

हल्लीं नुसत्या राशीवरून भविष्यें सांगणारीं व ४।८ आण्यांस मिळणारीं पुस्तकें बाजारांत मिळतात, त्यापैकीं हें नव्हे. हें पुस्तक अगदींच वेगळ्या तऱ्हेचें आहे व याबद्दल मोठमोठ्या विद्वानांचीं ( तज्ज्ञांचीं ) हार्दिक प्रशंसापत्रें मिळालीं आहेत. किं. १ रुपाया; टपाल हंशील शिवाय.

आमच्याकडे सर्व प्रकारचीं ज्योतिषविषयक कामें होतात. उत्तराकरितां तिकीट पाठवून पत्रव्यवहार करावा.

पत्ता:--दामोदर विनायकशास्त्री दांडेकर, ज्योतिषी
कुंटे बिल्डिंग, गिरगांव, बॅकरोड मुंबई नं. ४.

कसलाही खोकला व कसलाही दमा यावर

# हुपी

## एक अप्रतिम इलाज

किं. १० आ. चौपट मोठी बाटली २ रु.

सर्व प्रसिद्ध दुकानीं मिळेल; न मिळाल्यास व्ही. पी. नें मागवा. ट. ह. निराळें पडेल.

याशिवाय

१ राजकुसुम (हेअर ऑईल); २ सॅकलॅक्स (गोड एरंडेल); ३ क्लीनोडेंट (टूथपावडर व पेस्ट.) ४ बिकॉल (संततिप्रतिबंधक इलाज) इत्यादि अनेक वस्तु विक्रीस तयार !

पत्ता:-केमिस्ट घैसास, पुणें २ अथवा मुंबई २.

IRBK-0101116


री

# कुरुन्दवाड [स्टेट].

आमच्याकडे चोख चांदीचा व रुप्याचा सर्व तऱ्हेचा महाराष्ट्रीय, गुजराथी, कर्नाटकी, बंगाली वगैरे सर्व घाटाचा माल अत्यंत सुंदर व डौलदार असा तयार होतो.

## विशेषतः

आमचे डौलदार घाटाचे, लहान मोठे, चांदीचे करंडे व सफरचंद यांची प्रशंसा आखिल महाराष्ट्रांत होत आहे! आपण एक तावडतोब खरेदी करून आपल्या राणीसाहेबांना

## खूष करा!

याशिवाय–सोनें, चांदी, मोती, जडजवाहीर यांचेही उत्कृष्ट दागिने तयार अथवा नमुन्याप्रमाणें योग्य दरांत मिळतील,

येथील 'भालचंद्र' थिएटरांत नाटककंपन्या व सिनेमा यांना इलेक्ट्रिक लाईट माफक चार्ज घेऊन दिला जाईल.

लिहा अथवा भेटा.

**रामचंद्र सखाराम साजणीकर.**
प्रोप्रा. करंडकंपनी, कुरुंदवाड.


IRBK-0101116
IRBK-0101116

प्याकिंग व पोष्टेज खर्च निराळा.

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर

**नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें**

किं० रु. १८२–८१०–८६.

जागरणाची कामें करणारे नट, सर्कसवाले तारमास्तर, स्टेशनमास्तर व मानसिक श्रमाचीं कामें करणारे विद्यार्थी, वकील, वैद्य डॉक्टर, न्यायाधीश, गिरणीकामगार वगैरे लोकांस हें तेल वापरण्यास अत्यंत उपयोगी.

# बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंतकाढा नं० १ पहिले दहा दिवसांत घेण्याचा किं. ८१४

बाळंतकाढा नं० २–दहा दिवसांनंतर घेण्याचा किं. ८१४.

बाळकडू–मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य किं. ८४.

कुमारीआसव मुलांकरितां किं. ८१२.

बाळकडू गोळ्या–यांत बाळकडूचीं सर्व औषधें आहेत किं. ८४.

बाळघुटी–ताप, खोकला, हगवण यांवर किं. ८४.

बाळगोळी–( अफुयुक्त ) कृमी, अजीर्ण यांवर किं. ८४

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेला, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक.**

एक रत्तल रु. १८१० { **द्राक्षासव** } अर्धा रत्तल ८१४

दीड रत्तल रु. २८४ ट. व प्या. ख. नि.

याशिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५००० वर औषधें तयार असतात. त्याच्या माहितीचा मोठा क्याटलॉग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां ‘ रुग्णपत्रिका ’ ही ८७ चीं तिकिटें आली असतां पाठवूं.

ब्राह्मी तेलाचे व टिकाऊ काढ्याचे मूळ कल्पक व शोधक द. कृ. सांडू-ब्रदर्स आर्यौषधि कारखाना चेंबूर जि. ठाणें दुकान दवाखाना, ठाकुरद्वार मुं. नं. २